## कोकणात पावसाचे धूमशान; अलर्ट जारी

**रत्नागिरी :** कोकणात जोरदार पाऊस सुरू असून जनजीवनावर परिणाम झाला आहे. अशातच



आता काही ठिकाणी अतिवृष्टीची शक्यता आहे. रत्नागिरी, सिंधुदुर्गसाठी रेड अलर्ट, तर पालघर, ठाणे, मुंबई आणि रायगड जिल्ह्यासाठी ऑरेंज अलर्ट असल्याने अनेक भागात सतर्क राहण्याच्या सूचना जिल्हा प्रशासन आणि आपत्ती विभागांकडून देण्यात आलेल्या आहेत. कोकणात सर्वत्र मुसळधार पावसाचा अंदाज हवामान खात्याने वर्तवला आहे. पालघर, ठाणे, मुंबई आणि रायगड जिल्ह्यासाठी ऑरेंज अलर्ट देण्यात आला असून विजांच्या कडकडाटासह वाऱ्यांचा वेग ५०-६० किमी प्रति तास राहण्याचा अंदाज आहे. तळकोकणात रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यांमध्ये जोरदार पर्जन्यवृष्टी सुरू असून रेड अलर्ट जारी केल्याने हा पाऊस असाच सक्रिय राहण्याची चिन्हे आहेत.


रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १६ ◆ अंक ३५२

www.ramprahar.com

मंगळवार, ९ जुलै २०२४ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २


## अंतरंग


'स्मार्ट अंगणवाड्यांची संख्या वाढवण्यावर भर'/२

साहित्यिक वारकऱ्यांची अनोखी मैफील रंगली/५

टेबल टेनिस स्पर्धेमध्ये अनिशा पात्राला रौप्यपदक/८




# मुंबईत 'कोसळधार'!

### ठिकठिकाणी पाणी साचून दाणादाण; वाहतुकीवरही परिणाम



**मुंबई : प्रतिनिधी**

**मुंबईसह शहर आणि उपनगरात रविवारी रात्रभर मुसळधार पाऊस पडल्यामुळे दाणादाण उडाली. रात्री १ ते सकाळी ७पर्यंत अशा सहा तासांमध्ये तब्बल २६७ ते ३०० मिमी पावसाची नोंद झाली. अतिवृष्टीमुळे अनेक ठिकाणी पाणी साचले होते. वाहतूक व्यवस्थेवरही याचा मोठा परिणाम दिसून आला.**

राजधानी मुंबईत जोरदार पावसामुळे ठिकठिकाणी पाणी साचले. या पावसाचा रेल्वे आणि रस्ते वाहतुकीला फटका बसला. रेल्वेसेवा ठप्प झाल्याने सोमवारी आठवड्याच्या पहिल्या दिवशी कामावर निघालेल्या चाकरमान्यांची तारांबळ उडाली.

मुसळधार पावसाच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांची गैरसोय होऊ नये म्हणून मुंबई महानगरातील महापालिका, शासकीय, खासगी माध्यमांच्या शाळा व महाविद्यालयांना सुट्टी देण्यात आली होती.

दरम्यान, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सोमवारी (दि. ८) मंत्रालयातील राज्य आपत्ती नियंत्रण कक्षास आणि मुंबई महापालिकेच्या नियंत्रण कक्षास भेट देत परिस्थितीचा आढावा घेतला. या वेळी शालेय शिक्षणमंत्री तथा मुंबई शहरचे पालकमंत्री दीपक केसरकर, कौशल्य विकासमंत्री तथा मुंबई उपनगर जिल्ह्याचे पालकमंत्री मंगलप्रभात लोढा, ग्रामविकासमंत्री गिरीश महाजन, मदत व पुनर्वसनमंत्री अनिल पाटील, मुख्य सचिव सुजाता सौनिक, मुख्यमंत्र्यांचे अतिरीक्त मुख्य सचिव डॉ.आय.एस. चहल, मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव विकास खारगे, मदत व पुनर्वसन विभागाच्या प्रधान सचिव सोनिया सेठी उपस्थित होते.

राज्यात सर्वदूर सुरू असलेल्या जोरदार पावसाच्या पार्श्वभूमीवर जिल्हा स्तरावरील सर्व यंत्रणांनी सतर्क व सज्ज राहण्याचे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले आहेत. राज्यात काही दिवसांपासून जोरदार पाऊस सुरू आहे. या परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी मुख्यमंत्र्यांनी मंत्रालयातील नियंत्रण कक्षास भेट दिली. त्या वेळी त्यांनी जोरदार पर्जन्यवृष्टी लक्षात घेत अधिकाऱ्यांना सज्ज राहण्याच्या सूचना केल्या तसेच नागरिकांना काळजी घेण्याचे आवाहन केले.

## झोपडपट्टी पुनर्विकास प्रकल्प अद्यापही प्रलंबित

### आमदार प्रशांत ठाकूर यांनी वेधले शासनाचे लक्ष

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

मुंबईत झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण खासगी विकसकांच्या माध्यमातून पुनर्विकास प्रकल्प राबवत असून अनेक प्रकल्प अद्यापही प्रलंबित असल्याबाबत आमदार प्रशांत ठाकूर यांनी राज्य विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात तारांकित प्रश्न दाखल करून या प्रश्नाकडे शासनाचे लक्ष वेधले.




झोपडपट्टीवासीयांना पक्के घर मिळावे म्हणून मुंबईत झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण खासगी विकसकांच्या माध्यमातून पुनर्विकास प्रकल्प राबवत असून गेल्या तीन वर्षांपासून जवळजवळ २०० प्रकल्प प्रलंबित आहेत. त्यामुळे नागरिकांना घरे मिळण्यास विलंब होत आहे. या प्रकरणी शासनाने चौकशी करून प्रलंबित प्रकल्प तत्काळ पूर्ण करून रहिवाशांना दिलासा देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली, असा सवाल तारांकित प्रश्नाद्वारे आमदार प्रशांत ठाकूर यांनी केला.

राज्याचे गृहनिर्माणमंत्री अतुल सावे यांनी या प्रश्नावर दिलेल्या लेखी उत्तरात सांगितले की, झोपडपट्टी पुनर्वसन योजनांचा आढावा घेतला असता विविध कारणास्तव रखडलेल्या ३२० योजना त्यापैकी १०१ योजना कार्यान्वित झाल्या असून सद्यस्थितीत २१९ योजना रखडल्या आहेत. या २१९ योजनांपैकी १६६ योजना या विकसकांकडे निधी उपलब्ध होत नसल्याने रखडल्याचे आढळून आले आहे. उर्वरित योजनांपैकी २२ योजना या विविध प्राधिकरणांचे ना हरकत प्रमाणपत्र प्राप्त न झाल्याने, तर २२ योजना या न्यायालयीन प्रकरणामुळे रखडलेल्या आहेत तसेच नऊ योजनांमधील विकासकांवर कलम १३(२) अंतर्गत कारवाई करण्यात आलेली आहे. झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणामार्फत रखडलेल्या झोपु योजना मार्गी लावण्याकरिता शासन मान्यतेनंतर निविदा प्रक्रियेने विकसकाची नियुक्ती करणे, अभय योजना राबविणे मुंबई महानगर प्रदेशातील झोपडपट्टी पुनर्वसन योजना अन्य महामंडळे प्राधिकरणे/स्थानिक स्वराज्य संस्था मार्फत संयुक्त भागीदारी अन्वये राबविणे या तीन धोरणात्मक उपाययोजनांनुसार कार्यवाही करण्यात येत आहे.

## रायगडात पावसाचा जोर कायम

### अनेक ठिकाणी पाणी शिरले; महाडमध्ये एक जण गेला वाहून

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्याला सलग दोन दिवस पावसाने झोडपून काढले. अलिबाग, मुरुड आणि म्हसळा या तीन तालुक्यांमध्ये तर २४ तासांत २०० मिलिमीटरपेक्षा जास्त पावसाची नोंद झाली. मुरूडमध्ये सर्वाधिक २५१.४ मिमी पाऊस पडला. जिल्ह्यात ९५.६ मिमीच्या सरासरीने पाऊस झाला. मुसळधार पावसामुळे जनजीवन विस्कळीत झाले. अनेक घरांमध्ये पाणी घुसले. महाड तालुक्यातील रायगडवाडी येथील धबधब्यातील कुंडात पोहण्यासाठी गेलेला मनोज शांताराम खोपकर हा वाहून गेला.

रायगड जिल्ह्यात रविवारी रात्रीपासून मुसळधार पाऊस पडला. सोमवारी (दि. ८) सकाळी ८ वाजता संपलेल्या २४ तासांमध्ये जिल्ह्यात ९५.६ मिमीच्या सरासरीने पाऊस पडला. आतापर्यंत जुलै महिन्याच्या सरासरीच्या ८३.२ टक्के पाऊस झाला आहे. सोमवारी अलिबाग, मुरूड, म्हसळा या तालुक्यांमध्ये पावसाचा जोर होता. मुरूड तालुक्यात सर्वाधिक २५१.४ मिमी, म्हसळा तालुक्यात २३६.३ मिमी, तर अलिबाग तालुक्यात २१७.५ मिमी पाऊस पडला. अलिबाग व मुरूड तालुक्यातील शाळांना सोमवारी सुट्टी देण्यात आली होती. (पान २ वर..)

### किल्ले रायगडावर ढगफुटी



**महाड :** किल्ले रायगडावर रविवारी ढगफुटीसदृश पाऊस पडला. त्यामुळे पर्यटकांची तारांबळ उडाली. पायऱ्यांच्या कडेला असलेल्या तटबंदीचा आधार घेत त्यांनी स्वतःचा जीव वाचवला. दरम्यान, अतिवृष्टीमुळे सोमवार (दि. ८)पासून रायगड किल्ला पुढील दोन दिवस पर्यटकांसाठी बंद करण्यात आलेला आहे, मात्र जुलै अतिवृष्टीचा असल्याने किल्ला संपूर्ण महिना बंद ठेवण्यात यावा, असा प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालयाकडे पाठवण्यात आला आहे. **(सविस्तर वृत्त पान २ वर..)**

### तालुकानिहाय पडलेला पाऊस (मिलीमीटरमध्ये)

*मुरुड २५१.४, म्हसळा २३५.३, अलिबाग २१७.५, तळा १३७.७, श्रीवर्धन १३२.५, रोहा ११४.५, उरण ८५.६, माणगाव ७२.८, महाड ६६.२, पेण ५४.९, पनवेल ५७.२, पोलादपूर ४२.५, सुधागड २४.८, कर्जत १९.१, खालापूर १४.३, सरासरी : ९५.६ मिमी.*

## निवडक

### नीट परीक्षा पेपर लीकसंदर्भात प्रतिज्ञापत्र सादर करण्याचे निर्देश

**नवी दिल्ली :** नीट परीक्षेचा पेपर जर सोशल मीडियाच्या माध्यमातून लीक झाला असेल, तर ही परीक्षा पुन्हा घेण्याचे निर्देश द्यावे लागतील, मात्र केवळ दोन-तीन विद्यार्थ्यांनी काही चुकीचे कृत्य केले असेल, तर त्यासाठी संपूर्ण परीक्षा रद्द करता येणार नाही, अशी टिप्पणी सर्वोच्च न्यायालयाच्या सरन्यायाधीशांनी सोमवारी (दि. ८) सुनावणीदरम्यान केली. याबाबतची माहिती सादर करण्याचे निर्देश न्यायालयाने या वेळी राष्ट्रीय परीक्षा संस्था (एनटीए) आणि सीबीआयला दिले. या प्रकरणाची पुढील सुनावणी आता ११ जुलै रोजी होणार आहे.

### रायगड जिल्ह्यातील शाळा, महाविद्यालयांना आज सुट्टी

**अलिबाग :** सध्या सुरू असलेल्या जोरदार पावसामुळे रायगड जिल्ह्यातील सर्व शाळा व महाविद्यालये (अंगणवाडी, पूर्व प्राथमिक व प्राथमिक, माध्यमिक, महाविद्यालय) विद्यार्थ्यांना मंगळवारी (दि. ९) सुट्टी जाहीर करण्यात आली आहे, असे आदेश जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी दिले आहेत.

## पुण्यात पुन्हा हिट अ‍ॅण्ड रन

### पोलीस कॉन्स्टेबलचा मृत्यू; दुसरा जखमी

**पुणे : प्रतिनिधी**

मुंबईतील घटना ताजी असतानाच रविवारी मध्यरात्री पुण्यात पुन्हा एकदा हिट अ‍ॅण्ड रनचा प्रकार घडला आहे. पुणे-मुंबई महामार्गावर हॅरिस ब्रीजखाली भरधाव वेगात असलेल्या कारचालकाने दोन पोलिसांना उडवले. यात एका कॉन्स्टेबलचा जागीच मृत्यू झाला, तर दुसरा गंभीर जखमी झाला आहे.

खडकी पोलीस ठाण्यात बीट मार्शल म्हणून कार्यरत दोन कॉन्स्टेबल रात्री पावणेदोनच्या सुमारास गस्त घालण्यासाठी दुचाकीवरून जात असताना समोरून कारचालकाने जोरदार धडक दिली. यात पोलीस कॉन्स्टेबल समाधान कोळी जागीच मृत्युमुखी पडले, तर दुसरे संजोग शिंदे गंभीर जखमी झाले आहेत. त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. अपघातानंतर कारचालक फरार झाला.

या अपघातातील गाडी कोणाची होती? ती कोण चालवत होते? ती व्यक्ती अल्पवयीन होती का? याबद्दल कोणतीही माहिती समोर आलेली नाही. सध्या पोलिसांकडून या प्रकरणाचा तपास सुरू आहे.

### मिहीर शाहविरोधात लुकआऊट नोटीस जारी

**मुंबई :** येथील वरळी भागात भरधाव वेगात बीएमडब्ल्यू कार चालवून महिलेला चिरडणारा मिहीर शाह फरार आहे. त्याच्याविरोधात पोलिसांनी लुकआऊट नोटीस जारी केली आहे.

मिहीर शाहने मद्यप्राशन करून बीएमबडब्ल्यू कार चालवत रविवारी पहाटे नाखवा दाम्पत्याला भरधाव वेगात धडक दिली होता. यात कावेरी नाखवा यांचा मृत्यू झाला आहे. या प्रकरणी पोलिसांनी शिवसेना उपनेते असणारे मिहीरचे वडील आणि चालकाला अटक केली होती, मात्र कोर्टाने राजेश शाह यांची अटक बेकायदेशीर ठरवत १५ हजारांच्या जातमुचलक्यावर जामीन मंजूर केला आहे, तर चालक राजऋषी बिडावत याला एका दिवसाची पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे.





## बारापाडा येथील मंदिराच्या कामासाठी लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्याकडून देणगी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्यातील बारापाडा गावात असलेल्या भवानी माता मंदिराच्या उर्वरित कामासाठी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी अडीच लाख रुपयांची देणगी दिली आहे. यापूर्वी या मंदिराचे काम सुरू होतानाही त्यांनी एक लाख रुपयांची देणगी दिली होती.

बारापाडा गावात भवानी मातेच्या मंदिराचा जीर्णोद्धार आणि मूर्तीचा प्राणप्रतिष्ठा सोहळा शनिवार व रविवारी झाला. या मंदिरास लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी रविवारी सदिच्छा भेट देत दर्शन घेतले. या वेळी ग्रामस्थांनी उर्वरित कामासाठी लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्याकडे दोन लाख रुपयांच्या देणगीची मागणी केली. नेहमीच सढळ हस्ते मदतीचा हात देणारे दानशूर लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी ग्रामस्थांच्या मागणीपेक्षा जास्त म्हणजेच दोन लाख रुपयांऐवजी अडीच लाख रुपयांची देणगी या मंदिराच्या कामासाठी दिली. त्याबद्दल ग्रामस्थांनी लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे मनःपूर्वक आभार मानून कृतज्ञता व्यक्त केली.

या वेळी ठाकूर इन्फ्राप्रोजेक्ट्स् प्रा.लि.चे संचालक अमोघ ठाकूर, भाजपचे युवा कार्यकर्ते विद्याधर जोशी, दिनेश पाटील, ग्रामपंचायत सदस्य प्रफुल्ल पाटील, चंद्रकांत पाटील, उमेश पाटील, लक्ष्मण गावंड, महेश पाटील, सुनील गावंड यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## अलिबागमध्ये नागरिकांनी रात्र काढली जागून



**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबाग तालुक्यात रविवारी मध्यरात्री ढगफुटीसदृश पाऊस पडला. अनेक गावातील घरांमध्ये पाणी शिरले. अचानक पाणी वाढल्याने नागरिक भयभीत झाले होते. रामराज परिसरात भिलजी, बोरघर, रामराज, नेहुली, खंडाळे, मुळे परिसरातील नागरिकांनी रात्र जागून काढली.

अलिबागमध्ये रविवारी दिवसभर पावसाचा जोर नव्हता. अधूनमधून एखादी सर येत होती, मात्र रात्री उशिरा अचानक पावसाचा जोर वाढला. तालुक्यात सरासरी २१७.५ मिलीमीटर इतक्या पावसाची नोंद झाली आहे. यापैकी रामराज महसूल विभागात सर्वाधिक म्हणजे २८० मिमी पाऊस पडला. सारळ विभागात २२१, चरी मंडळात २३६, किहीम भागात २१४, पोयनाडमध्ये १८४, तर चौल मंडळ क्षेत्रात १९२ मिमी पाऊस झाला आहे. कमी वेळेत जास्त पाऊस पडल्याने पाणी वाढले. त्यामुळे सर्वांचीच त्रेधातिरपीट उडाली.

रविवारी दिवसभर पावसाचा जोर फारसा नसल्याने नागरिक निर्धास्त होते, पण मध्यरात्री पावसाचा जोर एवढा वाढला की गावातील रस्त्यांवरून पाणी वाहू लागले. रामराज परिसरात भिलजी, बोरघर, रामराज या गावांमध्ये कंबरभर पाणी साचले. घरांप्रमाणे वाहनेदेखील पाण्याखाली गेली. खंडाळे परिसरात नेहुली, खंडाळे, मुळे या गावांतील घरांमध्येदेखील पाणी शिरले.

काही कळायच्या आतच पाणी गावात शिरायला सुरुवात झाली, ज्यामुळे नागरिकांनी झोपेतून उठत सामानाची आवराआवर करायला सुरुवात केली, पण तोवर पाणी घरात शिरले होते. अनेकांच्या घरातील धान्य, कपडे, अंथरूण, फर्निचर भिजून नुकसान झाले. गावातील रस्त्यांवरून नाल्याप्रमाणे पाणी वाहत होते. त्यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण होते.

या भागातील काही घरांमध्ये दीड फुटापर्यंत पाणी चढले होते. पहाटे ४ वाजण्याच्या सुमारास पावसाचा जोर कमी झाला आणि त्यानंतर गावातील घरातील पाणी ओसरायला सुरुवात झाली. तेव्हा कुठे साऱ्यांचा जीव भांड्यात पडला. **(पान २ वर..)**

## ट्रेनखाली पडल्याने महिलेने गमावले पाय

**नवी मुंबई : बातमीदार, प्रतिनिधी**

मुसळधार पावसाने सोमवारी (दि. ८) लोकलसेवाही ठप्प झाली. अशातच नवी मुंबईच्या बेलापूर रेल्वेस्थानकावर गर्दीमुळे एक महिला रूळावर पडली आणि या वेळी गाडीखाली आल्याने तिचे दोन पाय निकामी झाले आहेत.

हार्बर मार्गावरील रेल्वेसेवा सतत पडणाऱ्या पावसामुळे विस्कळीत झाली. चुनाभट्टी स्थानकावर प्रचंड पाणी साचल्याने मानखुर्द ते वडाळ्यादरम्यान रेल्वेसेवा बंद ठेवण्यात आली होती. त्यामुळे हार्बर मार्गावर सर्वच स्थानकांवर मोठ्या प्रमाणात गर्दी झाली होती. बेलापूर स्टेशनवर प्लॅटफॉर्म क्रमांक ३वर एक महिला सोमवारी सकाळी १०च्या सुमारास लोकल पकडण्यासाठी गेली असता पाय घसरून लोकलखाली पडली. तेवढ्यात लोकल सुरू होऊन तिच्या अंगावरून गेली. यामध्ये ती महिला बचावली, मात्र तिला दोन्ही पाय गमवावे लागले आहेत. या दुर्घटनेची माहिती मिळताच रेल्वे आणि पोलीस प्रशासनाने तातडीने धाव घेतली. मोटरमनला सांगून लोकल हळूहळू मागे घेण्यात आली. या महिलेवर एमजीएम रुग्णालयात उपचार सुरू आहेत. **(सविस्तर वृत्त पान ६ वर..)**

## पनवेल तालुक्यात पावसामुळे नुकसान झालेल्या गावांची भाजप नेते अरुणशेठ भगत यांच्याकडून पाहणी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



पनवेल तालुक्यातील अनेक गावांना मुसळधार पावसाचा फटका बसला असून जनजीवन विस्कळीत झाले होते. या पार्श्वभूमीवर भाजपचे तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी पावसाचा फटका बसलेल्या गावांची सोमवारी (दि. ८) पाहणी करून परिस्थितीचा आढावा घेतला.

गेल्या दोन दिवसांपासून पनवेल तालुक्यात मुसळधार पावसाने हजेरी लावली. याचा फटका अनेक गावांना बसला. सखल भागात पाणी शिरले होते, तर अनेक इमारतींच्या आवारातदेखील पाणी साचल्याचे पहायला मिळाले. या पार्श्वभूमीवर भाजपचे तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी कोप्रोली आणि चिपळे-भोकरपाडा या ठिकाणी नुकसान झालेल्या जागांची पाहणी करून आढावा घेतला.



या वेळी अरुणशेठ भगत यांच्यासमवेत भाजपचे तालुका सरचिटणीस भूपेंद्र पाटील, चंद्रकांत राणे, मिलिंद राणे, युवा नेते विश्वजीत पाटील, भास्कर फुलोरे, हनुमंत फुलोरे, दत्ता फुलोरे, राजेश फुलोरे, मनीष फुलोरे, जीवन फुलोरे, रोशन पाटील, दत्ता मुळे, अनुराग पांडे आदी उपस्थित होते.

# किल्ले रायगडावर ढगफुटीसदृश्य पाऊस

## पर्यटकांची उडाली तारांबळ; दोन दिवस गड बंद

**महाड : प्रतिनिधी**

सध्या पावसाळा सुरू झाल्याने निसर्गाचे सौंदर्य डोळ्यात साचवून ठेवण्यासारखे आहे. पर्यटक पावसाचा आनंद घेण्यासाठी किल्ले रायगडाकडे वळले आहेत, मात्र रविवारी (दि.७) दुपारनंतर गडावर झालेल्या ढगफुटीसदृश्य पावसाने पर्यटकांची एकच तारांबळ उडवून दिली. यामुळे प्रशासनाने पुढील दोन दिवस किल्ले रायगड पर्यटकांसाठी बंद ठेवला आहे.

रायगड परिसरामध्ये आणि किल्ले रायगडावरील निसर्ग सौंदर्य डोळ्यात साठवण्यासाठी हजारो पर्यटक रायगडावर दाखल होत आहेत. दुपारपर्यंत सर्व काही सामान्य असताना अचानक गडावर पाऊस वाढला. यामुळे गडावर गेलेल्या पर्यटकांची एकच तारांबळ उडाली. रोपवेने पुन्हा खाली येण्यासाठी धावपळ सुरू झाली, मात्र वारा आणि पाऊस असल्याने रोपवेदेखील बंद ठेवण्यात आला. यामुळे अनेकांनी पायरी मार्गाने गड उतरण्यास सुरुवात केली. महादरवाजा आणि इतर ठिकाणी असलेल्या पाण्याच्या प्रवाहाने धबधब्याचे रूप धारण केले. पायऱ्यांवरदेखील धबधबा तयार झाला.



यामुळे पर्यटकांनी पायऱ्यांच्या कडेला असलेल्या तटबंदीचा आधार घेत स्वतःचा जीव वाचवला.

या ढगफुटीमुळे रायगड परिसरातून वाहणारी गांधारी, काळ, महाड परिसरातील सावित्री या नद्या तुडुंब भरून वाहू लागल्या. काळ नदीने रौद्र रूप धारण केल्याने बिरवाडी जकात नाका रस्त्यावर पुराचे पाणी आले. रायगड रस्त्यावर पाचाडजवळ ठिकठिकाणी मातीचा भराव आला. हिरकणीवाडी ते नेवाळी, सांदोशी रस्ता आणि इतर रस्त्यांवरदेखील मातीचा भराव आला.

### धबधब्यावर तरुण गेला वाहून

रायगडवाडी गावातील एक तरुण आपल्या मित्रांसह टकमक टोकाच्या खाली कोसळणाऱ्या धबधब्यावर गेला होता. अचानक पाणी वाढल्याने पाण्याचा अंदाज आला नाही आणि तो वाहून गेला आहे. मनोज खोपकर असे या तरुणाचे नाव आहे. एनडीआरएफ पथकाने तसेच स्थानिक तरुणांनी त्याचा शोध घेण्याचा प्रयत्न केला मात्र अद्याप तो सापडलेला नाही.

### महिनाभरासाठी गड बंद ठेवण्याचा प्रस्ताव

या परिसरात क्षणात बदलणारे हवामानामुळे ढगफुटीसदृश्य पाऊस होतो किंवा गडावरून दगड कोसळतात. त्यामुळे संपूर्ण जुलै महिना रायगड किल्ला संपूर्ण महिना बंद ठेवण्यात यावा, असा प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालयाकडे पाठविल्याचे उपविभागीय अधिकारी ज्ञानोबा बाणापुरे यांनी सांगितले.

# पनवेलमधील जि.प.च्या आठ शाळा नादुरूस्त

## नऊ शाळांतील १८ वर्गखोल्या धोकादायक

**पनवेल : वार्ताहर**

पनवेलमधील जिल्हा परिषदेच्या आठ शाळा नादुरूस्त आहेत. आडिवली, रोहिंजण, वडघर, वडघर आदिवासीवाडी, दिघाटी, बौद्धवाडी, पापडीचा पाडा, केळवणे येथील आठ शाळा नादुरूस्त आहेत. त्यांच्या दुरूस्तीसाठी ५२ लाख ६५ हजारांचा प्रस्ताव राजिपकडून राज्य शासनाकडे पाठवण्यात आला आहे, तर धोकादायक नऊ शाळा असून वर्गखोल्यांची संख्या १८ आहे.

धोकादायक शाळांमध्ये कामोठे, कन्याशाळा गव्हाण, चिखले, कोळखेपेठ, लोणीवली, दुंदरे, वाकडी, तळोदा पाचनंद उर्दू, सवणे या नऊ शाळांमध्ये १८ वर्गखोल्या धोकादायक आहेत. यापैकी कामोठे येथील वर्गखोल्या वापरात नाहीत. कन्याशाळा गव्हाण येथील वर्गखोली पाडण्यात आली आहे. चिखले येथील एक खोली वापरात नाही. कोळखेपेठ येथील खोलीच्या जागेचा वाद सुरू आहे. लोणीवली येथील दोन खोल्या वापरात नाहीत. दुंदरे येथे खोल्यांमध्ये अंगणवाडी बांधण्याचा प्रस्ताव आहे. वाकडी येथील खोली वापरात नाही. तळोजा पाचनंद येथील तीन उर्दू खोल्या वापरात नाहीत आणि सवणे येथील एक खोली वापरात नाही. काही शाळा महापालिका हद्दीतीलदेखील आहेत.



धोकादायक वर्ग खोल्या पाडण्यासाठीचा प्रस्ताव अलिबाग येथे पाठवण्यात आले असल्याची माहिती शिक्षण विभाग, पनवेल पंचायत समितीकडून देण्यात आली.

> **नादुरूस्त शाळांसाठी जिल्हा नियोजनमधून मंजुरी प्राप्त आहे, तसेच यू डायस प्रणालीमार्फत शासनाकडे तरतुदीची मागणी केली आहे. धोकादायक शाळांमध्ये विद्यार्थ्यांना बसवत नाहीत. इतरत्र त्यांची व्यवस्था करण्यात आलेली आहे, तसेच या धोकादायक शाळा पाडण्याची प्रक्रिया सुरू आहे.**
> **–अभिजीत मटकर, कनिष्ठ अभियंता**

# न्हावे गावात घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पाचे उद्घाटन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

न्हावे गावाच्या पर्यावरण संतुलनात मोलाची कामगिरी बजावेल अशा घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पाचे उद्घाटन ओएनजीसीचे जीजीएम हेड पंकज मंडाले यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमाचे प्रस्ताविक रयत शिक्षण संस्थेचेचे लाईफ मेंबर व न्हावे शाखेचे मुख्याध्यापक प्रमोद कोळी यांनी केले, तर आभार माजी सरपंच हरिश्चंद्र म्हात्रे यांनी मानले.

ओएनजीसीच्या सीएसआर फंडातून उभारण्यात आलेल्या घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प उभारणीत ठाणे येथील लाहस प्रतिष्ठान यांचे मार्गदर्शन व न्हावे ग्रामपंचायतीचे विशेष सहकार्य मोलाचे ठरले. या वेळी सरपंच विजेंद्र पाटील, उपसरपंच राजेश म्हात्रे, चंद्रकांत भोईर, माजी सरपंच हरिश्चंद्र म्हात्रे, सागर ठाकूर, एन. सी. ढालियार सिन्हा, अण्णादुराई, किरण निकम, विनिता अरोरा, पंकज मंडले, रमेश बाबू, निरज शर्मा, मुकेश बेलाय, दिवाकर राजबोनगक्षी, एच. बेहरा, नीता टिग्गा, आर. के. सोनकर उपस्थित होते.



या प्रकल्पामुळे न्हावे पंचक्रोशीतील पर्यावरण संरक्षणात महत्त्वाची भूमिका बजावली जाईल, याबद्दल ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले.

# स्मार्ट अंगणवाड्यांची संख्या वाढविण्यावर भर

## महिला व बालविकासमंत्री आदिती तटकरे यांची माहिती

**मुंबई : प्रतिनिधी**

शासनाच्या मालकीच्या जागेतील अंगणवाड्यांमधून दरवर्षी पाच हजार अंगणवाड्या स्मार्ट करण्याची योजना सुरू आहे. याअंतर्गत मागील तीन वर्षात १६,८८५ अंगणवाडी केंद्रांचे स्मार्ट अंगणवाडी केंद्रांमध्ये रुपांतर झाले असून याची गती वाढविण्यासाठी शासनाकडे परवानगी मागितली जाणार असल्याचे महिला व बालविकासमंत्री आदिती तटकरे यांनी विधान परिषदेत सांगितले.

भाडेतत्वावरील अंगणवाड्यांच्या भाड्यामध्ये दुपटीने वाढ करण्यात आली असून अधिकची वाढ करण्याबाबत सकारात्मक पावले उचलली जातील, असेही त्यांनी सांगितले.

मंत्री तटकरे म्हणाल्या की, राज्यात एक लाख १० हजार ५५६ अंगणवाडी केंद्र आहेत. यापैकी ७२,३७९ केंद्र मालकीच्या जागेत आहेत. ज्या केंद्रांना मालकीची जागा नाही तेथे जागा उपलब्ध करून देण्याबाबत जिल्हाधिकाऱ्यांकडे मागणी केली आहे. जेथे अंगणवाडी केंद्र नाहीत अशा ८०८४ नवीन अंगणवाडी केंद्रांचे प्रस्ताव मंजुरीसाठी केंद्र सरकारकडे पाठविण्यात आले आहेत. ज्या अंगणवाडी केंद्रांना वीज उपलब्ध होत नाही अथवा वीज खंडित होते. त्याठिकाणी सोलरच्या माध्यमातून ही अडचण दूर करण्यासाठी अर्थसंकल्पात तरतूद करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

मुंबईतील झोपडपट्टीमध्ये ५१४७ अंगणवाडी केंद्र आहेत. महानगरपालिका क्षेत्रामध्ये एकूण अंगणवाडी केंद्रांपैकी २० ते २५ टक्के केंद्र महिला व बालविकास विभागांतर्गत आहेत. इतर केंद्र महापालिकेमार्फत सुरू आहेत. अंगणवाडी केंद्राचा सर्व मुलांना लाभ व्हावा यासाठी शासन आणि महानगरपालिकेमार्फत एकत्रित प्रयत्न करण्यात येतील. ज्या ठिकाणी जागा उपलब्ध होत नसेल अशा ठिकाणी सुविधा असलेल्या कंटेनरमध्ये अंगणवाडी सुरू करण्याचे धोरण आहे. एसआरएमधील जागा उपलब्ध होण्यासाठीदेखील प्रयत्न करण्यात येत आहेत. महापालिका क्षेत्रातील भाडेतत्वावरील अंगणवाडी केंद्रांच्या भाड्याच्या रकमेत चार हजार वरून आठ हजार, अ वर्ग नगरपालिका क्षेत्रात तीन वरून सहा हजार, तर ग्रामीण भागातही भाड्याच्या रकमेत दुपटीने वाढ करण्यात आली असल्याचे मंत्री तटकरे यांनी सांगितले. अंगणवाडी केंद्राच्या जागेत स्वच्छता असावी, तसेच भाड्याच्या जागेसाठी रेडीरेकनर प्रमाणे भाडे द्यावे, अशी सूचना उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी या वेळी केली.

# तक्का मराठी शाळेत ‘लाडकी बहीण’साठी शिबिराची मागणी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थीसाठी तक्का मराठी शाळा येथे शिबिर आयोजित करावे, अशी मागणी भाजपचे उत्तर रायगड उपाध्यक्ष जयंत पगडे यांनी महापालिका आयुक्त मंगेश चितळे यांना निवेदनाद्वारे केली आहे.

या निवेदनात म्हटले आहे की, राज्य सरकारने मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना आणली आहे. या योजनेंतर्गत पात्र महिलांना दरमहा १५०० रुपये अनुदान मिळणार आहे. प्रभाग क्रमांक २०, तक्का गाव व आजूबाजूच्या परिसरात मोठ्या संख्येने लाभार्थी राहत असून आर्थिकदृष्ट्या मागास असलेल्या महिलांची संख्याही मोठी आहे. तक्का गाव हा गावठाण भाग असून आजूबाजूस कातकरीवाडी, वैदूवाडी हा आदिवासी भागदेखील आहे. पात्र लाभार्थ्यांना याचा लाभ मिळण्याच्या दृष्टिकोनातून त्यांचे फॉर्म भरणे अत्यंत गरजेचे आहे.

तक्का गावातील सर्व पात्र महिलांच्या वतीने आपणांस विनंती करतो की तक्का मराठी प्राथमिक शाळेत पनवेल महापालिकेच्या संबंधित प्रशासनामार्फत येत्या आठ दिवसांत शिबिर आयोजित करावे, जेणेकरून गरीब महिला-भगिनींना या योजनेचा लाभ मिळण्यासाठी फायदा होईल. या शिबिरासाठी तक्का ग्रामस्थ व एकविरा युवक मित्र मंडळ तक्का पनवेल यांचे प्रशासनास आवश्यक ते सहकार्य व मदत निश्चितपणे देण्यात येईल, असेही भाजप जिल्हा उपाध्यक्ष जयंत पगडे यांनी नमूद केले आहे.

# मुसळधार पावसामुळे अलिबाग-रोहा मार्ग ठप्प

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

रायगडमध्ये रविवारी रात्रीपासून मुसळधार पाऊस सुरू आहे. त्यामुळे रायगडमधील विविध भागात पाणी साचले आहे. अलिबाग ते रोहा परिसरात मोठ्या प्रमाणात पाणी साचलेले दिसून आले.

जोरदार पावसामुळे अलिबाग ते रोहा रस्ते वाहतूक सेवेवरदेखील मोठा परिणाम झाला आहे. रायगडमधील सखल भागात मोठ्या प्रमाणात पाणी साचले आहे. पाणी साचल्याने वाहनचालकांना पाण्यातून वाट काढत प्रवास करावा लागला. रस्ता बंद झाल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.



# ‘सीकेटी’मध्ये महाकवी कालिदास दिन साजरा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या नवीन पनवेल येथील सीकेटी ज्युनिअर कॉलेजमध्ये आषाढ महिन्याच्या पहिल्या दिवसाचे औचित्य साधून राष्ट्रीय सेवा योजने(एनएसएस)मार्फत महाकवी कालिदास दिन साजरा करण्यात आला.



भारतीय साहित्यातील एक सुवर्णपान ज्यांचे साहित्य भारतातील नाही तर जगातील अनेक भाषांमध्ये अनुवादित केले गेले आहे. माध्यमिक विभागातील संस्कृत विषय शिक्षिका अश्विनी देशमुखे यांनी या वेळी महाकवी कालिदासांच्या साहित्याची आणि संस्कृत भाषेची माहिती श्लोक व गीतातून सादर केली, तसेच इ. दहावीत संस्कृत विषयात १००पैकी ९९ गुण प्राप्त करणाऱ्या विद्यार्थिनी वैष्णवी शिंदे आणि दीपश्री नवकर यांनी कालिदासांच्या शाकुंतल आणि मेघदूत या काव्याची माहिती आपल्या शब्दातून व्यक्त केली, तसेच बारावी वाणिज्य वर्गातील स्नेहा शिंदे आणि सानिका बर्वे यांनी संस्कृत श्लोकांच्या माध्यमातून आपापली मनोगते व्यक्त केली. ज्युनिअर कॉलेजचे प्राचार्य प्रशांत मोरे यांचे मार्गदर्शन या कार्यक्रमास लाभले. या वेळी कला वाणिज्य विभागाचे पर्यवेक्षक अजित सोनवणे, तसेच मारुती राजगोड, बाळासाहेब बडे, राजेंद्र गांगरे हे शिक्षक तसेच एनएसएसचे ८० विद्यार्थी या कार्यक्रमास उपस्थित होते. कार्यक्रमाचे नियोजन कार्यक्रम अधिकारी विवेक पाटील आणि गणेश पाटील यांनी केले. सम्यक कांबळे या विद्यार्थ्यांने सूत्रसंचालन केले.

पान १ वरुन

### रायगडात पावसाचा जोर कायम

अलिबाग तालुक्यातील वरसोली येथील बुरूमखान, चौल, नेहुली, मुळे, बामणोली, राजमळा, नागाव, श्रीगाव, रामराज, भिजली बोरघर, सहाण या गावांतील काही घरांमध्ये पाणी शिरून नुकसान झाले. अलिबाग शहरातदेखील सखल भागात पाणी साचले होते, तर अलिबाग-रोहा रस्ता पाण्याखाली गेला होता. महाड तालुक्यातील बिरवाडी येथील भैरवनाथनगर येथील अंतर्गत नाल्याची भिंत कोसळली. तेथील एका घरातील पाच जणांना जवळच्या घरात स्थलांतरीत करण्यात आले आहे. महाड नवेनगर येथील सहकारी खरेदी विक्री संघ महाड यांच्या गोडाऊनची एक भित शेजारच्या पिठाच्या गिरणीवर पडली. रायगडवाडी येथील धबधब्यातील कुंडात पोहण्यास गेलेला मनोज खोपकर पाण्यात वाहून गेला आहे.

मुरूड-साळाव रस्त्यावरील चिकणी गावाजवळील पूल खचला आहे. खबरदारीचा उपाय म्हणून हा पूल रात्री १० ते सकाळी ६ वाजेपर्यंत संपूर्ण वाहतुकीसाठी बंद करण्यात आला आहे. आता पर्यायी रस्ता साळाव-सुपेगाव- मुरूड आणि साळाव-रोहा-मुरूड आहे. मुरूड तालुक्यातील इंदापूर मार्गावर माती आल्यामुळे वाहतुकीवर परिणाम झाला होता. ही माती हटविण्यात आली आहे. खारदोडकुले, शिघ्रे, मुरूड साळाव, वाळवटी, चोरढे, कोर्लई, बोर्ली, महालोर, लक्ष्मीखार येथील घरांमध्ये पाणी शिरून नुकसान झाले. पनवेल तालुक्यातील तोंडरे येथील काही घरांमध्ये पाणी शिरून नुकसान झाले. माणगाव तालुक्यातील लाखपाले येथे गुरांचा गोठा कोसळला. साई येथे घरांमध्ये पाणी शिरून नुकसान झाले.

### अलिबागमध्ये नागरिकांनी रात्र काढली जागून

अलिबागचे तहसीलदार विक्रम पाटील यांना रात्रीच याची माहिती मिळाली. आपल्या टीमसह त्यांनी पूरग्रस्त भागाचा दौरा केला. सकाळी तलाठी, ग्रामसेवक यांच्या मदतीने पंचनाम्यांचे काम तातडीने हाती घेण्यात आले.

राजकीय पक्षांचे पदाधिकारी, लोकप्रतिनिधी यांनी सोमवारी सकाळपासूनच आपदग्रस्त भागाला भेटी दिल्या, त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या. काहींना मदतदेखील केली. शिवसेनेच्या जि.प.च्या माजी गटनेत्या मानसी दळवी यांनी तालुकाप्रमुख अनंत गोंधळी, नियोजन समिती सदस्य संतोष निगडे यांच्यासह रामराज परिसराला भेट देऊन पाहणी व आपदग्रस्तांची विचारपूस केली.

# शिष्यवृत्ती परीक्षेत आराध्या भगत पनवेल तालुक्यात चौथी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

श्री भैरवदेव विद्यालय व लोकनेते रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालय रिटघर येथील पूर्व प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेत आराध्या राम भगत ही विद्यार्थिनी पनवेल तालुक्यात चौथी आली.

विद्यालयाचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, मुख्याध्यापक बी. बी. साळुंखे व सर्व शिक्षक यांनी आराध्याचे गुलाबपुष्प देऊन कौतुक केले तसेच पुढील आयुष्यासाठी तिला भरभरून आशीर्वाद दिले.


अर्पिता विजय सपकाळ, स्वरा सुधीर शेळके, नेहा नारायण भोपी, नव्या बाळू जांभळे, सोहाना जावेद अन्सारी, वरुण लक्ष्मण विश्वकर्मा हे विद्यार्थी पूर्व प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेत उत्तीर्ण झाले. या सर्वांचे विद्यालयातर्फे अभिनंदन केले.

पूर्व प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेसाठी मार्गदर्शन करणारे सर्व शिक्षक व विभाग प्रमुख खुटले मॅडम यांचेसुद्धा विद्यालयातर्फे अभिनंदन केले.




## दुखवटा

### महादेव शिर्के



**नागोठणे :** कडसुरे ग्रामपंचायतीचे माजी सरपंच दत्तात्रेय शिर्के यांचे वडील रायगड जिल्ह्याचे पालकमंत्री उदय सामंत यांचे आजेसासरे पिगोंडे ग्रामपंचायतीचे माजी सरपंच महादेव कानू शिर्के यांचे वयाच्या ९८व्या वर्षी मंगळवारी (दि. ३) वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात चार मुले, एक मुलगी, सूना, जावई, नातवंडे, पणतू असा मोठा परिवार असून त्यांची दशक्रिया विधी त्यांचे १२ जुलै रोजी अंबा नदीकिनारी तर उत्तरकार्य १५ जुलै रोजी राहत्या घरी कडसुरे येथे होणार आहे.

### रत्नीबाई जैन



**कर्जत :** शहरातील व्यापारी रणजीत जैन यांच्या मातोश्री रत्नीबाई जैन यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. निधनासमयी त्या ८४ वर्षांच्या होत्या. जैन समजाच्या कोकणातील पहिल्या महिला वैमानिक क्रिशा जैन यांच्या त्या आजी होत्या. त्यांच्या पश्चात तीन मुले, एक मुलगी, सूना, जावई, नातवंडे, पतवंडे असा परिवार आहे.

## निवडक

### देवद येथून एक जण बेपत्ता

**पनवेल :** देवद येथे राहणारा ३८ वर्षीय रामनाथ सुदाम मेंदारकर हॉस्पिटलमध्ये जाऊन येतो असे सांगून बाहेर गेला आणि तो घरी परत ना आल्याने तो हरवला असल्याची तक्रार खान्देश्वर पोलीस ठाण्यात करण्यात आली. त्याची उंची पाच फूट, रंग गोरा, केस काळे आहेत. तो अंगाने मध्यम असून अंगात सफेद शर्ट, निळी जीन्स आहे. त्याची दाढी साधारण वाढलेली असून पायात चॉकलेटी रंगाची सँडल आहे. या व्यक्तीबाबत अधिक माहिती असल्यास सहाय्यक फौजदार सुभाष मिस्त्री यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### अल्पवयीन मुलाचे अपहरण

**पनवेल :** १७ वर्षीय मुलाचे अपहरण केल्याप्रकरणी अनोळखी व्यक्तीविरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. १७ वर्षीय समर याला पित्ताचा त्रास असल्याने तो आठवड्यापासून पनवेलला आयुर्वेदिक डॉक्टरांच्याकडे ट्रेनने जात असे व ट्रेनने परत येत असे. तीन जुलै रोजी समर दुपारी आयुर्वेदिक डॉक्टरांकडे ट्रेनने पनवेल येथे गेला. या वेळी डॉक्टरांनी समरला पनवेल स्टेशनला सायंकाळी ६ वाजता सोडले. रात्री पावणेदहा वाजता डॉक्टरांना समरबाबत विचारले असता त्यांनी सहा वाजता पनवेल स्टेशनला सोडले असल्याचे सांगितले. त्यावेळी समरचा फोन बंद असे. त्यानंतर समरचा इतरत्र शोध घेतला, मात्र तो सापडून आला नाही. अनोळखी व्यक्तीने त्याचे अपहरण केले.

### लॉजवरील जुगार अड्ड्यावर कारवाई

**पनवेल :** काळुंद्रे गावातील भिंगारीपाडा येथे एका लॉजमध्ये पैसे लावून तीन पत्ती जुगार खेळणाऱ्यांवर पनवेल शहर पोलिसांनी कारवाई केली आहे. या ठिकाणी जुगार अड्डा सुरू असून तेथे काही लोक पैसे लावून जुगार खेळत असल्याची माहिती पनवेल शहर पोलिसांना मिळताच त्यांच्या विशेष पथकाने छापा मारून सहा जणांना तीन पत्ती जुगार खेळताना ताब्यात घेतले असून त्यांच्याकडून १४ हजार ४०० रुपयांची रक्कम हस्तगत केली आहे.

### महिलेचा विनयभंग, गुन्हा दाखल

**पनवेल :** ज्येष्ठ नागरिकाच्या घरी केवायसी अपडेट करण्यासाठी गेलेल्या २५ वर्षीय महिलेचा विनयभंग केल्याप्रकरणी प्रदीप सदावर्ते (वय ७०, रा. खारघर) याच्याविरोधात बीएनएस कलम ७४ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला. २५ वर्षीय महिला बँकेत नोकरी करत असून त्या प्रदीप सदावर्ते यांच्या घरी केवायसी अपडेट करण्यासाठी गेल्या होत्या. या वेळी त्यांनी महिलेला हाताला धरून खुर्चीत बसवले आणि पाठीवरून हात फिरवला. या प्रकरणी पोलीस अधिक तपास करत आहेत.

# पावसाच्या पाण्याचा निचरा होण्यासाठी चर्चा

## पनवेल मनपाची बैठक; आपत्ती व्यवस्थापन कार्याचा आढावा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महापालिका कार्यक्षेत्रात शनिवारी झालेल्या मुसळधार पावसामुळे ज्या ज्या ठिकाणी पाणी साठले, त्या मागील कारणमीमांसा करण्यासाठी आयुक्त मंगेश चितळे यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये मुख्यालयात सोमवारी (दि. ८) आढावा बैठक आयोजित करण्यात आली. या वेळी आयुक्तांनी पाणी तुंबण्याच्या समस्यांवर तातडीने उपाययोजना करण्याबाबत अधिकाऱ्यांना आदेशित केले.



या वेळी सहाय्यक संचालक नगररचना ज्योती कवाडे, उपायुक्त कैलास गावडे, उपायुक्त डॉ. वैभव विधाते, उपायुक्त मारूती गायकवाड, मुख्य वैद्यकिय अधिकारी डॉ. आनंद गोसावी, कार्यकारी अभियंता सुधीर सांळुखे, सहाय्यक आयुक्त स्वरूप खारगे, चारही प्रभागाचे प्रभाग अधिकारी, महापालिका अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

शनिवारी रात्री झालेल्या मुसळधार पावसामुळे कळंबोलीमध्ये विविध ठिकाणी पाणी साचल्यामुळे नागरिकांची मोठ्या प्रमाणात गैरसोय झाली. वास्तविक पहाता कळंबोली भाग हा समद्रीसाटीपासून खाली आहे. इतरवेळी पाऊस जास्त आल्यास, पाणी पंपाच्या साह्याने धारण तलावामध्ये सोडण्यात येते. धारण तलावामधील पाणी खाडीमध्ये सोडण्यात येते, परंतू रविवारी भरती असल्याकारणाने व याचवेळी पाऊस जास्त आल्याने खाडी मध्ये पाणी सामावून घेतले गेले नाही. पाणी पुन्हा मागे आले व कळंबोलीतील सखल भागात सर्वत्र पाणी साठले. या समस्येवर आजच्या बैठकीत चर्चा करण्यात आली.

पाणी तुंबण्याच्या कारणांचा आढावा आयुक्तांनी घेतला तसेच या वेळी सिडकोच्या ताब्यातील मलनिस्सारण केंद्रामधील सात पंपापैकी चार पंप सुरू होते. त्यामुळे नागरिकांच्या शौचालयामधून घरांमध्ये पाणी आले असल्याची माहिती मलनिस्सारण विभाग प्रमुखांनी दिली. पाणी साठण्यामागील हेदेखील महत्त्वाचे कारण होते. त्यामुळे हे मलनिस्सारण केंद्र तातडीने महापालिकेच्या ताब्यात घेण्याविषयी सिडको प्राधिकरणाबरोबर पत्रव्यवहार करण्याच्या सूचना आयुक्तांनी संबधित विभागास दिल्या.

कळंबोलीतील तीन मुख्य नाल्यांतून पाणी पुढे का गेले नाही, तिथे निर्माण झालेल्या अडचणी त्यावरील उपाययोजना याबाबत आयुक्तांनी सविस्तर आढावा घेतला. या ठिकाणी तातडीने उपाययोजना करण्याबाबतच्या सूचना आयुक्तांनी संबधित अधिकाऱ्यांना दिल्या.

या वेळी पनवेल व नवीन पनवेलमध्ये पाणी साठण्याची कारणे यावर चर्चा करण्यात आली. पनवेलमधील कच्छी मोहल्ल्यामधील भारत नगरमध्ये व नवीन पनवेलमध्ये बांठिया शाळा, तक्का येथे मुसळधार पावसाने पाणी साठल्याचे दिसून आले. या ठिकाणी पाणी साठू नये यावरील तोडगा काढण्यावर बैठकीत चर्चा करण्यात आली.

अग्निशमन केंद्रांची सेवा वाढविण्याच्या दृष्टीने सूचना देण्यात आल्या. सिडकोकडील अग्निशमन केंद्र हस्तांतरण करण्याबाबत चर्चा झाली.

## रामशेठ ठाकूर महाविद्यालयात अमली पदार्थ सेवनविरोधी जनजागृती

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालय व नवी मुंबई क्राईम ब्रँच यांच्या संयुक्त विद्यमाने सोमवारी (दि. ८) अमली पदार्थ सेवनविरोधी सत्राचे आयोजन केले होते.



'संत संगती सदा घडो सृजन वाक्य कानी पडो' या ओवीनुसार प्राध्यापकांचे व विद्यार्थ्यांचे आचरण चांगले असणे गरजेचे आहे तसेच प्राध्यापक व विद्यार्थ्यांनी पियर प्रेशरच्या आहारी जाऊ नये, डार्क वेबचा वापर करू नये, असे आवाहन नवी मुंबई क्राईम ब्रँच वरिष्ठ पोलीस निरीक्षक डॉ. सुशील माने यांनी उपस्थित प्राध्यापकांना व विद्यार्थ्यांना केले जर आपल्या महाविद्यालयाच्या परिसरात कोणी ड्रग्स विक्री व सेवन करत असेल, तर ११२वर कॉल करण्याचे आवाहनसुद्धा त्यांनी या वेळी केले.

या कार्यक्रमाला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रूपेंद्र गायकवाड तसेच रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयाच्या मुख्याध्यापिका निशा नायर यांच्यासह विद्यार्थी व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.




**पनवेल : रायगड जिल्हा परिषदेच्या भोकरपाडा शाळेत श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळातर्फे विद्यार्थ्यांना वह्यांचे मोफत वाटप करण्यात आले. या वेळी भाजप युवा मोर्चा तालुका सरचिटणीस विश्वजीत पाटील, ग्रामस्थ भास्कर फुलोरे, हनुमान फुलोरे, गणेश फुलोरे, राजू फुलोरे आदी उपस्थित होते.**

## आमदार प्रशांत ठाकूर यांचा जगन्नाथ रथयात्रांमध्ये सहभाग



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भगवान जगन्नाथ रथयात्रा आषाढ शुक्ल पक्षाच्या दुसऱ्या दिवशी सुरू होते. सनातन धर्मात जगन्नाथ रथयात्रेला अनन्यसाधारण महत्व आहे. या अंतर्गत खारघर, कामोठे आणि सुकापूरमध्ये रथयात्रेचे आयोजन रविवारी (दि. ७) करण्यात आले होते. या यात्रांमध्ये आमदार प्रशांत ठाकूर यांनी सहभागी होत दर्शन घेतले.

सुकापूर येथे श्री श्री जगन्नाथ संस्कृतीका सेवा ट्रस्ट यांच्या वतीने जगन्नाथ रथयात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच कामोठे येथे श्री जगन्नाथ मंदिर आणि इस्कॉन मंदिर खारघर यांच्या संयुक्त विद्यमाने जगन्नाथ रथयात्रेचे आयोजन करण्यात आले होते. कामोठे सेक्टर ३६मधून या यात्रेला सुरुवात झाली असून सेक्टर १४ येथील कराडी हॉल येथे सांगता झाली. या यात्रेचा प्रारंभ माजी नगरसेवक डॉ. अरुणकुमार भगत यांच्या हस्ते नारळ फोडून करण्यात आला. त्याचप्रमाणे सुकापूरमध्येही यात्रेचे आयोजन करण्यात आले होते.

सुकापूर येथे अध्यक्ष जादुमणी चक्र, सचिव संतोष राम, पीआरओ आणि समन्वयक रणजित दास, खजिनदार कैलास चौधरी, मांगुली सेनापती, विजय पात्रा तसेच कामोठे येथे माजी नगरसेवक संतोष शेट्टी, अजय बहिरा, विकास घरत, भाजप सुकापूर अध्यक्ष राजेश पाटील, ज्ञानेश्वर पाटील, आशा भगत, श्वेता शेट्टी, अध्यक्ष रंजन देहुरी, कृष्ण महाराणा, शंकरराव त्रिंबके, चित्रसेन पाणिग्रही, जगजीत पात्रो, प्रदीप साहू, महेंद्र साहू, आरती महाराणा, सावित्री पाणिग्रही आदी उपस्थित होते.



**पनवेल : खासदार श्रीरंग बारणे यांची गव्हाण ग्रामपंचायतीचे उपसरपंच विजय घरत यांनी सदिच्छा भेट घेतली.**



**पनवेल : श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या वतीने दरवर्षी गरीब, गरजू विद्यार्थ्यांना वह्यांचे मोफत वाटप करण्यात येते.त्यानुसार किरवली गावातील आडिवली रायगड जिल्हा परिषदेच्या शाळेत सोमवारी वह्यावाटपाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या वेळी भाजपचे रवी म्हात्रे, माजी सरपंच नंदकुमार म्हात्रे, कार्यकर्ते कैलास गायकर, बाळू पाटील आदी उपस्थित होते.**

## बिमा व्यापारी संकुल निवडणुकीत रामदास शेवाळेंच्या पॅनलचा विजय

**पनवेल : वार्ताहर**

कळंबोली येथील बिमा व्यापारी संकुलाची निवडणूक दोन सत्र बिनविरोध झाली होती, परंतु या वेळी निवडणूक लागल्याने बिमा एकता पॅनेल आणि बिमा विकास पॅनेल यांच्यात लढत झाली. या निवडणुकीत रामदास शेवाळे यांच्या बिमा एकता पॅनलने १९ पैकी १९ जागा जिंकून बिमा विकास पॅनलचा दणदणीत पराभव करून एकहाती बहुमत मिळविले आहे.

मुंबईतील नामांकित मोठ्या स्टील व्यापाऱ्यांसह तब्बल ६९२ सदस्य असलेल्या सोसायटीच्या निवडणुकीचा प्रचार मुंबईपर्यंत सुरू होता. मुंबईमधील व्यापारी निलेश पारिख व प्रशांत पारिख यांनी बिमा एकता पॅनेल साठी कंबर कसली होती. पंधरा वर्षे या सोसायटीचे अध्यक्ष असलेले रामदास शेवाळे शिवसेना शिंदे गटाचे जिल्हाप्रमुख असल्याने या निवडणुकीला राजकीय महत्त्व प्राप्त झाले होते.

विरोधी पॅनेलने कळंबोलीसह पनवेल मधील महाविकास आघाडीचे सर्व नेते बिमा कॉम्पलेक्सच्या बुथवर ठाण मांडून होते. दरम्यान या निडवणुकीत विजयी झालेल्या सर्व विजयी उमेदवारांचे पनवेल परिसरातून अभिनंदन होत आहे.

## 'लाडकी बहीण'च्या लाभार्थ्यांसाठी शिबिर

### भाजप महिला पदाधिकाऱ्यांनी घेतला आढावा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिकेच्या वतीने मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या अंमलबजावणीला सुरुवात झाली आहे. या अंतर्गत महापालिका कार्यक्षेत्रात पाच ठिकाणी विशेष शिबिराचे आयोजन राज्य शासनाच्या महिला आणि बाल विकास विभागाच्या शासन निर्णयानुसार मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण ही योजना सुरू करण्यात आलेली आहे.

याअंतर्गत पनवेल शहरातील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवनामध्ये आयोजित करण्यात आलेल्या या शिबिराला माजी उपमहापौर चारुशीला घरत, माजी नगरसेविका दर्शना भोईर आणि भाजप महिला मोर्चाच्या पनवेल शहर अध्यक्षा राजश्री वावेकर यांनी सोमवारी भेट देऊन आढावा घेतला.



पनवेल महापालिका कार्यक्षेत्रात योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने उपायुक्त बाबासाहेब राजळे यांच्या मार्गदर्शनाखाली नियोजन करण्यात आले आहे. जास्तीत जास्त लाभार्थी भगिनींनी या योजनेचा लाभ मिळण्याच्या दृष्टीने महापालिकेच्या वतीने महिला बाल कल्याण विभागातर्फे पाच प्रभाग समिती निहाय विशेष शिबीरांचे नियोजन करण्यात आले आहे. हे विशेष शिबिर ८ ते १० जुलै रोजी सकाळी १० ते ६ या वेळात घेतले जाणार आहेत. प्रत्येक प्रभाग समितीमध्ये अंगणवाडी सेविका, महापालिकेचे कर्मचारी तसेच आरोग्य विभागामार्फत परिचारक असे एकुण १५० मदतनीस कार्यरत असणार आहेत. तसेच प्रत्येक प्रभाग समिती निहाय ५ रिक्षाद्वारे योजनेसाठी लागणारी कागदपत्रे तसेच शिबिराची प्रसिद्धी करण्यात येत आहे.

आयुक्तांच्या सूचनेनुसार मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या प्रचार आणि प्रसिद्धसाठी शहरातील विविध ठिकाणी होर्डिंग्ज तसेच १०० ठिकाणी बॅनर्स लावण्यात आले आहेत. याचबरोबर दहा हजार पॅम्प्लेट्सचे वाटप करण्यात येत आहे तसेच पथनाट्याद्वारेही प्रत्येक प्रभाग समितीमध्ये जनजागृती करण्यात येत आहे.

## सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर स्कूलमध्ये निवडणूक उत्साहात

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या उलवे नोड येथील सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर स्कूल सीबीएससी विभागाच्या विद्यार्थी परिषद २०२४-२५साठी विद्यार्थी आणि शिक्षकांमार्फत निवडणूक प्रक्रिया झाली.

यामध्ये स्कूलच्या शैक्षणिक वर्ष २०२४-२५साठी स्कुल प्रमुख मुलगा, मुलगी, खेळ विभाग, सांस्कृतिक विभागप्रमुख, रेड-ग्रीन-ब्लू-येल्लो या चार हाऊसचे प्रमुख मुलगा आणि मुलगी या पदांसाठी विद्यार्थ्यां मार्फत मतदान घेण्यात आले.

पाचवी ते आठवीच्या विद्यार्थ्यांनी यामध्ये मतदान केले तसेच यात शिक्षकांनीही सहभाग घेतला. स्कूलच्या मुख्याध्यापिका मुक्ता खटावकर यांच्या मुख्य मार्गदर्शनाखाली क्रीडाशिक्षक संग्राम फोफेरकर आणि संगीत शिक्षक हर्षल फडके यांच्यामार्फत ही प्रक्रिया झाली.




## रोटरी क्लब ऑफ पनवेल सेंट्रलचे पदग्रहण



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रोटरी क्लब ऑफ पनवेल सेंट्रलचा रोटरी वर्ष २०२४-२५ अध्यक्ष पदग्रहणाचा सोहळा अतिशय दिमाखात झाला. पनवेलमधील प्रथितयश मसाल्याचे उद्योजक रोटेरियन शैलेश पोटे यांनी २०२४- २०२५ या वर्षांच्या अध्यक्ष पदाची धुरा खांद्यावर घेतली.

या कार्यक्रमासाठी डिस्ट्रीक्ट ३१३१ चे डिस्ट्रीक्ट गव्हर्नर नॉमिनी नितीन ढमाले हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. तसेच प्रसिद्ध उद्योजक काशिनाथ पोटे आणि पनवेलचे प्रसिद्ध सर्जन डॉ. गिरीश गुणे हे गेस्ट ऑफ ऑनर म्हणून उपस्थितीत होते. तसेच असिस्टंट गव्हर्नर डॉ. किरण कल्याणकर, पनवेलचे माजी सभागृह नेते रोटेरियन परेश ठाकूर उपस्थित होते.

पनवेलमधील इतर रोटरी क्लबचे प्रेसिडेंट, इतर डिस्ट्रीक्ट डिग्निटरीज रोटरी क्लब ऑफ पनवेल सेंट्रलचे इतर सभासद आणि पनवेलमधील इतर मान्यवर निमंत्रित यांच्या उपस्थितीत हा सोहळा उत्साहात झाला.

## संपादकीय

# तारांबळ उडवणारा पाऊस!

बराच काळ ओढ दिल्यानंतर पावसाने पुन्हा एकदा महाराष्ट्राच्या भूमीकडे मोहरा वळवला ही एकीकडे चांगली गोष्ट आहे, पण काही ठिकाणी रविवारपासून अतिमुसळधार पावसाने पूरसदृश स्थिती निर्माण झाल्याने चिंताजनक परिस्थितीही ओढवली आहे.

**जून महिना उलटून गेला तरी राज्यात पावसाचा नीटसा पत्ता नव्हता. जो काही पाऊस झाला होता, तो अगदीच नावापुरता. एवढ्याशा पावसात कुणी पेरण्या उरकण्याच्या फंदात पडत नाही. हवामान खात्यानेही पेरण्यांची घाई करू नका, असा सल्ला शेतकरी बांधवांना दिला होता. तथापि, जुलैत मात्र पाऊस महाराष्ट्रात सर्वदूर पसरू लागल्याची चिन्हे आभाळात दिसू लागली आहेत. रविवारी मध्यरात्रीपासून कोकणात मुसळधार पावसामुळे रेड लर्ट देण्यात आला असून चिपळूणसारख्या ठिकाणी राष्ट्रीय आपत्ती निवारण दलाच्या तुकड्या ताबडतोब रवाना करण्यात आल्या आहेत. कोकणातील सर्वच जिल्ह्यांमध्ये मुसळधार पावसाची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. जुलैचा पाऊस मुंबई कधीच विसरू शकणार नाही. २००५ साली याच जुलै महिन्याच्या २६ तारखेला मुंबईत पावसाने हाहाकार माजवला होता. रविवारी रात्री पावसाने त्याच दिवसाची आठवण यावी असे थैमान घातले. सुदैवाने सकाळनंतर पावसाचा जोर काहिसा ओसरल्याने दाणादाण उडण्यापलिकडे हानी झाली नाही. रात्रभर पावसाचा जोर इतका होता की उपनगरी रेल्वे गाड्यांचे वेळापत्रक सकाळी कोलमडले आणि रस्तोरस्ती पाणी साचून वाहतूक कोंडी झाली. मुंबईत अनेक ठिकाणी मेट्रो प्रकल्पाची कामे सुरू असल्याने रस्त्यांची दुर्दशा झाली आहे. गेली कित्येक वर्षे खड्डेमय रस्त्यांवरून चालण्याचे मुंबईकरांच्या नशिबी आहेच. मध्यंतरी नालेसफाईबद्दल मुंबई महापालिका प्रशासनाने दावे केले होते, परंतु फार काही बदललेले नाही याचे प्रत्यंतर एकाच पावसात आले. खड्डेमय रस्ते आणि वरवरची नालेसफाई याला पालिका प्रशासन आणि मुंबईवर वर्षानुवर्षे सत्ता गाजवणारी उबाठासेनाच जबाबदार असल्याची टीका भारतीय जनता पक्षाकडून करण्यात आली. एका पावसात मुंबईच्या नागरी व्यवस्थेने अशी नांगी टाकावी! दुर्दैवाने या महानगरीबद्दल कुणालाच आस्था नाही ही वस्तुस्थिती आहे. नागरी व्यवस्थेला एकदा पैसा देणारी सोन्याची कोंबडी समजले की सामाजिक बांधिलकी उरतच नाही. नेमके हेच मुंबईचे दु:ख आहे. विधिमंडळाच्या अधिवेशनाचा दुसरा आठवडा सोमवारी सुरू झाला. या दिवशी बऱ्याच महत्त्वाच्या बैठका, तसेच सभागृहाचे काम होणार होते. परंतु जवळपास आठ ते दहा आमदार विदर्भ सुपरफास्ट एक्सप्रेस आणि अमरावती एक्सप्रेसमध्ये अडकून पडल्याने वेळेवर सभागृहात पोहचू शकले नाहीत. राष्ट्रवादी अजित पवार गटाचे नेते अमोल मिटकरी आणि मदत व पुनर्वसन मंत्री अनिल पाटील यांना तर रेल्वे रूळांमधून चालत मार्ग काढावा लागला. व्हीआयपी मंडळींचे हे हाल झाले, तर सामान्य चाकरमान्यांचे काय झाले असेल याची कल्पना सहज करता येते. येणारे काही तास आणखी मुसळधार पावसाची शक्यता असल्याने लोकांनी शक्य असल्यास घरीच थांबावे, असा सल्ला दिला गेला आहे. अर्थात या तारांबळीमुळे पाऊस नकोसा मात्र वाटू नये. महाराष्ट्राला हा पाऊस संजीवनी देणारा आहे, हे लक्षात घेऊनच आपल्या भावना व्यक्त करायला हव्यात. आजही महाराष्ट्राच्या बऱ्याच भागांमध्ये पावसाची प्रतीक्षा शेतकरी बांधव करीत आहेत. धरणे भरली, शेतेशिवारे फुलली की मगच महाराष्ट्राचा जीव खऱ्या अर्थाने भांड्यात पडेल. तारांबळ उडवणारा पाऊस मुंबईकरही फारसा मनावर घेणार नाहीत.**

# रायगड किल्ल्यावर कचऱ्याचा ढीग, अधिकारी उदासीन

**खबरबात**
**महेश शिंदे**

ऐतिहासिक किल्ले रायगडावर ६ जून आणि १९ जून रोजी तारीख आणि तिथीप्रमाणे शिवराज्याभिषेक सोहळे पार पडल्यानंतर गडावर जमा झालेला कचरा सामाजिक संस्था आणि प्रशासकीय यंत्रणेमार्फत संग्रहित केला होता, मात्र हा कचरा रायगड रोप वे अप्पर स्टेशनच्या जवळच पडून आहे. या कचऱ्यामुळे मोठ्या प्रमाणात दुर्गंधी पसरली असुन रायगडाचे विद्रुपीकरण होत आहे.



किल्ले रायगडावर ६ जून रोजी तारखेप्रमाणे आणि १९-२० जून रोजी तिथीप्रमाणे शिवराज्याभिषेक सोहळा झाला. या शिवराज्याभिषेक सोहळ्याकरता संपूर्ण महाराष्ट्रातून लाखो शिवभक्तांनी हजेरी लावली होती. गडावर आलेल्या शिवभक्तांच्या विविध सुविधा किल्ले रायगडावर पुरवण्यासाठी प्रशासनामार्फत जय्यत तयारीदेखील करण्यात आली होती. शिवभक्तांना लागणारे पिण्याचे पाणी पॅकिंग बाटलीद्वारे पुरवण्यात आले होते. हे पाणी पिल्यानंतर मोठ्या प्रमाणात रिकाम्या बाटल्या गडावर पडून होत्या. त्याचप्रमाणे गडावर भोजन व्यवस्थादेखील करण्यात आली होती. हे भोजन वाटप करण्याकरता प्लास्टिकच्या पत्रावळ्या देण्यात आल्या होत्या. सामाजिक संस्था आणि प्रशासकीय यंत्रणेमार्फत हा कचरा दुसऱ्या दिवशी उचलण्यात आला. गडावर मोठ्या प्रमाणात साफसफाई करण्यात आली. प्लास्टिकच्या बॅगमधून हा कचरा रायगड रोपवे अप्पर स्टेशन जवळ आणून टाकण्यात आला आहे. शिवराज्याभिषेक सोहळे होऊन आज जवळपास अनेक दिवस उलटून गेले आहे, मात्र अद्याप हा कचरा पडून राहिल्याने या ठिकाणी दुर्गंधी पसरत आहे. प्लास्टिक कचरा असल्याने गडावरील पर्यावरणातदेखील धोका निर्माण होत आहे.

रायगड किल्ला पाहण्यासाठी आणि शिवराज्याभिषेक सोहळ्यासाठी गडावर दरवर्षी लाखो शिवभक्त आणि पर्यटक भेट देत असतात. गडाची देखभाल दुरुस्ती पुरातत्त्व विभागाच्या अंतर्गत येत असली तरी सध्या गडावरील संवर्धनाचे काम रायगड प्राधिकरणाच्या माध्यमातून होत आहे. त्यामुळे गडावर रायगड प्राधिकरणाने विशेष लक्ष देणे गरजेचे आहे, मात्र एकीकडे संवर्धन होत असताना दुसरीकडे पर्यटक आणि शिवप्रेमी यांच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर प्लास्टिक बाटल्यांचा वापर गडावर वाढला आहे. यामुळे शिवराज्याभिषेक सोहळा आणि इतर कार्यक्रमानंतर गडावर मोठ्या प्रमाणावर प्लास्टिक कचरा जमा होत आहे. या कचऱ्याची विल्हेवाट लावण्याची जबाबदारी स्थानिक प्रशासनाची आहे, मात्र स्थानिक प्रशासनाकडून याबाबत दुर्लक्ष केले आहे. नुकत्याच झालेल्या शिवराज्याभिषेक सोहळ्याच्या कार्यक्रमासाठी पाणीपुरवठा आणि स्वच्छता करण्याची जबाबदारी जिल्हा परिषदेवर होती. मात्र जिल्हा परिषदेच्या माध्यमातून रायगड रोपवे अप्पर स्टेशन येथे संग्रहित केलेला कचरा आजही उचलण्यात आलेला नाही. याबाबतीत महाड पंचायत समितीच्या गटविकास अधिकारी यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला, मात्र संबंधित अधिकारी मध्ये किल्ले रायगडा बाबत प्रचंड उदासीनता दिसून येते.

गडावर आलेल्या शिवभक्तांसाठी पाणीपुरवठा आणि स्वच्छता याबाबतची सर्व जबाबदारी रायगड जिल्हा परिषदेकडे होती. याबाबत माहिती घेऊन कार्यवाही केली जाईल, असे महाड उपविभागीय अधिकारी ज्ञानोबा बाणापुरे यांनी सांगितले.


किल्ले रायगडावरशिवराज्याभिषेक सोहळ्यानंतर बऱ्यापैकी साफसफाई झालेली आहे, मात्र संग्रहित केलेला कचरा विलेवाट न झाल्याने रायगड रोपवे जवळ तसाच पडून आहे. हा कचरा गडाखाली नेण्याची जबाबदारी स्थानिक प्रशासनाने स्वीकारून त्याची विल्हेवाट लावली जावी, अशी प्रतिक्रिया पुणे येथील शिवप्रेमी हर्षवर्धन पाटील यांनी व्यक्त केली.

# आशिया खंडातील सर्वांत जुने मुंबई शेअर मार्केट

मुंबई शेअर बाजार हा आशिया खंडातील सर्वांत जुना शेअर बाजार आहे. १४२ वर्ष जुन्या असलेल्या मुंबई शेअर बाजाराची स्थापना ९ जुलै १८७५ साली झाली. व्यापारी प्रेमचंद रॉयचंद यांनी मुंबई शेअर बाजाराची स्थापना केली. प्रेमचंद रॉयचंद हे व्यापारी रॉयचंद दीपचंद यांचे पुत्र होते. सफाईदारपणे इंग्लिश बोलणाऱ्या प्रेमचंद यांनी १८४९ मध्ये शेअर ब्रोकर म्हणून कामाला सुरूवात केली. कापूस आणि सोन्याच्या व्यवसायात त्यांनी आपला दबदबा तयार केला.

मुंबई शेअर बाजाराचे जन्मस्थान हे १८५० मध्ये एक वडाच्या झाडाखाली आहे. सद्या हे ठिकाण हार्निमन सर्कल नावाने ओळखले जाते. टाऊन हॉलजवळ वडाच्या झाडाखाली प्रेमचंद रॉयचंद आणि इतर दलाल लोक एकत्र येऊन वेगवेगळ्या धंद्यांची दलाली करायचे. मुख्यतः या वेळी कापसाचे सौदे व्हायचे. सुरूवातील चार गुजराती आणि एक पारसी हे दलाल होते. या दलालांना बसण्यास अशी विशिष्ट जागा नव्हती. तसेच वेळेचे बंधन आणि कुठलेही नियमही नव्हते.

टाऊन हॉलसमोरील वडाच्या झाडाखाली हे सर्व दलाल लोक एकत्र येत असत. हळूहळू या ठिकणी दलालांची संख्या वाढली. त्यामुळे येथे जागा अपुरी पडू लागली. १८७४च्या आसपास वेगवेगळ्या ठिकाणी स्थलांतर होवून सध्याच्या दलाल स्ट्रीट येथे व्यवहार करायचे




ठरवले आणि त्यानंतर 'द नेटीव शेअर न्ड स्टॉक ब्रोकर्सही संस्था १८७५ स्थापन होऊन व्यवहार सुरू झाले.

प्रेमचंद रॉयचंद हे व्यापारी 'द नेटीव शेअर न्ड स्टॉक ब्रोकर्स'चे संस्थापक सदस्य होते. 'द नेटीव शेअर अॅन्ड स्टॉक ब्रोकर्स'ची सुरूवात २५ शेअर दलालांनी अवघ्या एका रुपयात केली होती. ३१ ऑगस्ट १९५७ रोजी भारत सरकारने या बाजारास सिक्युरिटीज कॉन्ट्रक्ट क्ट १८५६ अन्वये मान्यता दिली. अशा तऱ्हेने भारतातील पहिला मान्यताप्राप्त शेअर बाजार अस्तित्वात आला. सध्या मुंबई शेअर बाजार हा जगातील ११ व्या क्रमांकाचा शेअर बाजार आहे

शेअर बाजार हा एक असा बाजार आहे की ज्या ठिकाणी कंपन्यांच्या शेअर्सची खरेदी - विक्री केली जाते. सुरूवातीला शेअर्सची खरेदी-विक्री तोंडी होत असे. खरेदीदार आणि विक्रेता लिलावामार्फत हे व्यवहार करत होते. मात्र, आता हे सर्व व्यवहार शेअर बाजाराच्या नेटवर्कने जोडलेल्या कॉम्प्युटरमार्फत होतो. इंटरनेटवरही ही सुविधा मिळते. आता अशी परिस्थिती आहे की खरेदीदार आणि विक्रेता एकमेकांना ओळखूही शकत नाहीत. काही वर्षांपूर्वी मुंबई शेअर बाजारात थेट खरेदी - विक्री करावी लागत होती, मात्र मागील काही वर्षांपासून कॉम्प्युटर आणि इंटरनेटच्या माध्यमातून कोणीही घरबसल्या शेअर्स खरेदी करू शकतो आणि विकूही शकतो. अवघ्या काही सेकंदामध्ये हा व्यवहार पूर्ण होतो.

आता तर मोबाइल अॅप्समार्फतही आपण हे व्यवहार अगदी सहजपणे करू शकतो. माहिती तंत्रज्ञान क्रांतीचे हे उत्कृष्ठ उदाहरण आहे. जे काम पूर्वी फक्त काही पैसेवालेच करू शकत होते ते आता एक सर्वसामान्य माणूसही करू शकतो. डीमॅट खात्यामार्फत शेअर विकत घेऊ शकतो आणि विकू शकतो.

**(साभार : इंटरनेट)**



## बदलते तंत्रज्ञान

# 'ओला' वापरणार स्वतःचा मॅप; १०० कोटींची बचत होणार!

ऑनलाइन कॅब सेवा देणारी कंपनी ओलाने शुक्रवारी एक मोठी घोषणा केली आहे. ऑनलाइन टॅक्सी कंपनी ओला आता नेव्हिगेशनसाठी गुगल मॅपची मदत घेणार नाही. कंपनीने स्वत:च्या विकसित मॅप प्लॅटफॉर्म Ola Maps वर शिफ्ट होण्याची घोषणा केली आहे. ओला कॅबने स्वतःचा नकाशा लाँच केला असून त्याला ओला मॅप्स असे नाव देण्यात आले आहे. कंपनीचे सह-संस्थापक आणि सीईओ भाविश अग्रवाल यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्सवर (पूर्वीचे ट्विटर) पोस्ट करून ही माहिती दिली आहे.



भाविश अग्रवाल म्हणाले, आम्ही Google Maps साठी दरवर्षी १०० कोटी रुपये खर्च करत होतो. मात्र, आता आम्ही आमच्या स्वतःच्या Ola Maps वर स्विच केले आहे. त्यामुळे यासाठी येणारा हा सर्व खर्च पूर्णपणे वाचवला आहे


दरम्यान, काही महिन्यांपूर्वीच ओलाने मायक्रोसॉफ्ट झ्युरकडून क्लाऊड इन्फ्रास्ट्रक्चर बदलले होते. आता कंपनी स्वतःची इकोसिस्टम चालवेल आणि तिचे त्यावर लार्ज लँग्वेज मॉडेल (LLM) आर्टिफिशियल इंटेलिजन्सही चालणार आहे.

भाविश अग्रवाल यांनी असेही सांगितले की, आगामी काळात ओला मॅप्समध्ये आणखी बरीच नवीन फीचर्स जोडली जातील. जसे की स्टीट व्ह्यू, ३ डी मॅप्स, न्यूरल रेडियंस फील्ड्स (NERFs), इनडोअर इमेजिस, ड्रोन मॅप्स इत्यादी. Ola Maps तयार करण्यासाठी OpenStreetMap नावाचा ओपन-सोर्स प्रकल्पदेखील वापरला गेला आहे. OpenStreetMap सोबत ओला कंपनीने स्वतःचा डेटादेखील वापरला आहे.

दरम्यान, सामान्य लोक Google Maps मोफत वापरू शकतात. पण ओला सारख्या कंपन्या गुगल मॅप्सचे ॲप्लिकेशन प्रोग्रामिंग इंटरफेस (एपीआय) वापरतात, ज्यासाठी त्यांना पैसे द्यावे लागतात. ओला कंपनीला आशा आहे की, स्वत:चा Ola Maps वापरून ते आपला खर्च वाचवतील. मात्र, ओलाला स्वतःचा मॅप चालवण्यासाठी काही पैसे खर्च करावे लागतील.

Ola Maps केवळ ओलाच्या राइड-हेलिंग सर्व्हिस आणि इलेक्ट्रिक वाहनांसाठीच नसेल. तर डेव्हलपर्सदेखील ओला मॅप्सचे API वापरण्यास सक्षम असतील. म्हणजेच इतर ॲप बनवणाऱ्या कंपन्याही त्यांच्या प्समध्ये ओला मॅप्स वापरू शकतील, मात्र यासाठी डेव्हलपर्सना ओलाला पैसे द्यावे लागतील. हे पेमेंट ओलाच्या कृत्रिम क्लाउड सिस्टमद्वारे केले जाईल.

# आदर्श लोकप्रतिनिधी रामभाऊ म्हाळगी



**निमित्त**

रामचंद्र काशीनाथ म्हाळगी ऊर्फ रामभाऊ म्हाळगी हे आरएसएसचे प्रचारक होते. साधारणपणे १९५२-५३ च्या सुमारास ते राजकारणात आले. सुरुवातीला भारतीय जनसंघ अर्थात आताचे भाजपच्या संघटनाची जबाबदारी त्यांच्यावर सोपवण्यात आली. त्यांनी भारतीय जनसंघाच्या प्रचारासाठी आणि संघटात्मक बांधणीसाठी महाराष्ट्रभर प्रवास केला. आत रामभाऊ म्हाळगी यांचा जन्मदिन आहे.


रामभाऊ म्हाळगी यांचा जन्म ९ जुलै १९२१ रोजी पुणे जिल्ह्यातील कुडूस गावामध्ये झाला. त्यांचे प्राथमिक शिक्षण जन्मगावी कुडूसमध्ये, तर माध्यमिक शिक्षण पुण्यात झाले. रामभाऊ विद्यार्थी दशेतच राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या संपर्कात आले. मद्रास व सोलापूर येथे त्यांनी संघ प्रचारक म्हणून काम केले. येथूनच त्यांच्या सार्वजनिक जीवनाला एका अर्थाने प्रारंभ झाला. पुढे त्यांनी गोवा विमोचन समितीच्या कार्यकारी समितीचे सचिव, संयुक्त महाराष्ट्र समितीच्या जनरल काउन्सिलचे सदस्य, महाराष्ट्र दुष्काळ निवारण समितीच्या जनरल काउन्सिलचे सदस्य म्हणूनही काम केले.

जनसंघाची स्थापना झाल्यावर महाराष्ट्राच्या विधानसभेत निवडून जाणारे ते पहिलेच आमदार होते. पुढे ते आपल्या कार्याच्या जोरावर जनसंघचे प्रदेशाध्यक्ष देखील बनले. त्यांची जडणघडणच संघाच्या मुशीत झाले. त्यांच्यावर विद्यार्थी दशेतच संघाचे संस्कार झाले. महाराष्ट्रात संघाची विचारसरणी रुजवण्यात रामभाऊ म्हाळगींचा सिंहाचा वाटा होता. त्यांच्या ठाई असलेली अभ्यासू वृत्ती. सुसंस्कृतपणा व साधेपणामुळे त्यांना जनसंघाचे द्रोणाचर्य म्हणून ओळखले जायचे. सत्तरच्या दशकात जनसंघाचे केवळ चारच आमदार विधानसभेत होते. त्यामध्ये रामभाऊ म्हाळगी यांचा समावेश होतो. जनसंघाचे जरी चारच आमदार असले तरी देखील रामभाऊ म्हाळगी यांचा त्यांच्या अभ्यासपूर्ण भाषणामुळे विधनसभेत मोठा दबदबा होता. पुण्याहून निवडून गेलेल्या रामभाऊ म्हाळगी हे बोलू लागले की, सर्व सभागृह शांत असायचे त्यांच्या भाषणात कधीही गोंधळ होत नव्हता.

कुशल संसदपटू आदर्श लोकप्रतिनिधी आणि तळमळीचे सामाजिक कार्यकर्ते यासोबतच संघ प्रचारक म्हणून रामभाऊ म्हाळगी यांना ओळखले जायचे. ते १९५७, १९६७ आणि १९७२ असे तीन वेळा भारतीय जनसंघाकडून विधानसभेत आमदार तर १९७७ व १९८० असे दोन वेळा ठाणे मतदार संघातून लोकसभेचे खासदार म्हणून निवडून गेले. याचसोबत ते मध्य रेल्वे स्टेशन मास्टर्स संघटनेचे उपाध्यक्ष आणि पुणे बार काउंन्सिलचे उपाध्यक्ष देखील होते. रामभाऊ म्हाळगी यांनी खऱ्या अर्थाने भारतीय जनसंघ महाराष्ट्रात वाढवण्याचे काम केले.

**(साभार : इंटरनेट)**

## क्लिक...क्लिक...!



**पेण : पावसाळ्यातील निसर्गाचे रूप प्रत्येक सजीवसृष्टीला आकर्षक करीत असते. मान्सून आता सक्रिय झाला असून निसर्गही खुलत आहे. अशा पावसाळी वातावरणाचे खारपाडा परिसरात सायली रावले-वैद्य यांनी टिपलेले छायाचित्र.**

## आरोग्य प्रहर

# आता कोलेस्ट्रॉलचे इतके प्रमाणही धोक्याची घंटा

कार्डिओलॉजिकल सोसायटी ऑफ इंडिया या संस्थेने डिस्लिपिडेमिया (रक्तात कोलेस्ट्रॉलची पातळी वाढणे) आजारा संबंधी भारतीय नागरिकांच्या संदर्भातील स्वतंत्र मानके जारी केली आहेत. भारतीयांच्या शरीरात एकूण कोलेस्ट्रॉलची पातळी किती असावी या संदर्भात नवे ठोकताळे जारी झाले आहेत. भारतात डिस्लिपिडेमिया या आजाराचे वाढते प्रमाण पाहून कार्डिओलॉजिकल सोसायटी ऑफ इंडियाने हा निर्णय घेतला आहे.



डिस्लिपिडेमिया हा एक सायलेंट किलर आजार आहे, या आजाराची लक्षणे सहसा दिसत नाहीत. हा आजार शरीरात हळूहळू वाढत जातो आणि हृदयविकारासह इतर अनेक आजारांचा त्यामुळे धोका वाढतो असे कार्डिओलॉजिकल सोसायटी ऑफ इंडियाचे अध्यक्ष डॉ. प्रताप चंद्र रथ यांनी म्हटले आहे. कोलेस्ट्रॉल ओळखण्यासाठी नागरिकांनी ल्युपिड प्रोफाइल टेस्ट करून घ्यावी असे कार्डिओलॉजिकल सोसायटी ऑफ इंडियाचे सरचिटणीस डॉ. दुर्जती प्रसाद सिन्हा यांनी सांगितले.

सामान्य लोकांमध्ये एलडीएल-सीची (बॅड कोलेस्ट्रॉल) पातळी 100 mg/dLच्या खाली आणि नॉन-एचडीएल-सीची पातळी 130 mg/dLच्या खाली असायला हवी. उच्च जोखीमवाले व्यक्ती ज्यांना डायबिटीज वा उच्च रक्तदाब आहे. त्यांना एलडीएल-सीची पातळी ७० mg/dL हून खाली आणि आणि नॉन-एचडीएलची पातळी १०० mg/dLहून खाली राखण्याचे लक्ष्य ठेवले पाहीजे. त्याच्याहून कमी किंवा जादा पातळी असणे तब्येतीसाठी धोकादायक आहे.

ज्यांना हार्टअॅटॅक किंवा पक्षघात वा क्रोनिक किडनी आजाराचा पूर्व इतिहास आहे. अशा उच्च जोखीमवाल्या रुग्णांनी एलडीएल-सी पातळी 55 mg/dL हून खाली वा नॉन-एचडीएल पातळी 85 mg/dLहून खाली राखण्याचे लक्ष्य ठेवायला हवे असे नवी दिल्लीच्या सर गंगाराम हॉस्पिटलच्या कार्डिओलॉजी विभागाचे अध्यक्ष डॉ. जे. पी. एस. साहनी यांनी म्हटले आहे.

जीवनशैलीतील बदल करणे, जसे की नियमित व्यायाम करणे, दारू आणि तंबाखू सोडणे आणि साखरेचे सेवन कमी करणे, हे महत्त्वाचे आहे. हृदयविकार, स्ट्रोक किंवा मधुमेह असलेल्या रुग्णांमध्ये स्टॅटिन, नॉन-स्टॅटिन औषधे आणि फिश ऑइल (ईपीए) ची शिफारस केली जाते. 500 mg/dL वरील ट्रायग्लिसराइड पातळीसाठी फेनोफायब्रेट, सॅग्लिटाझोअर आणि फिश ऑइल वापरणे आवश्यक आहे. या लोकांनी ही औषधे घ्यावीत असे डॉ. जे. पी. एस. साहनी यांनी सांगितले.

# मुरुडमध्ये पावसाने हाहाकार

## घरात पाणी घुसले; जनजीवन विस्कळीत





**मुरुड : प्रतिनिधी**

तालुक्यात रविवारी रात्रीपासून पावसाने जोरदार सुरुवात केल्याने जनजीवन विस्कळीत झाले आहे. केवळ एका रात्रीत मुरुडमध्ये २५५ मिमी पावसाची नोंद करण्यात आली. काही ठिकाणी घरात पाणी शिरले असून रस्त्यावरही पाणी साचून वाहतूक पूर्णपणे ठप्प झाली आहे.

तालुक्यातील काशिद ग्रामपंचायत हद्दीतील चिकणी गावाच्या मुख्य रस्त्यावरील पुलाला मुसळधार पावसामुळे भगदाड पडल्याने ग्रामस्थ भयभीत झाले आहेत. सार्वजनिक बांधकाम विभागाला कळताच विभागाचे अधिकारी रमेश गोरे व त्यांची टिम घटनास्थळी पोहचून परिस्थितीचा आढावा घेतला. त्याठिकाणी धोक्याची निशाणी लावण्यात आली असून वाहतूक एका बाजूने बंद ठेवण्यात आली आहे.

नांदगाव हायस्कूलनजिक असलेला लहान पूलही खचला आहे. दोन वर्षांपूर्वी येथे पुलाचे काम मंजूर झाले होते, परंतु ठेकेदाराने काम न केल्याने त्याचा फटका खारीकवाडा व अन्य परिसराला सहन करावा लागत आहे. याबाबत सहजीवन विद्यामंडळाचे अध्यक्ष फैरोज घलटे यांनी तहसीलदार रोहन शिंदे यांना सत्य परिस्थिती सांगितली. यावर तातडीने उपायोजना करण्यात यावी, अशी मागणी ग्रामस्थांतर्फे करण्यात आली.





नांदगाव येथील गणेशनगर, कुंभारवाडा येथे पाणी साचले. खारदौडकुले, शीघ्रे, लक्ष्मीखर आदी भागातील घरात पाणी शिरल्याने मालमत्तेचे नुकसान झाले आहे.

शहरातील स्मशानभूमीत असणारे मोठे झाड विजेच्या खांबावर पडल्याने तारा तुटल्या व खांब वाकला होता. त्यामुळे वीजपुरवठा खंडित झाला.

# 'रेवस ते करंजा मार्गाचे काम निर्धारित वेळेत पूर्ण करणार'

**रायगड : रामप्रहर वृत्त**



रेवस बंदर ते कारंजा मार्गाच्या कामाच्या सुधारित ३७ कोटींच्या प्रस्तावाला प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून निर्धारित वेळेत या मार्गाचे काम पूर्ण करण्यात येणार असल्याचे सार्वजनिक बांधकाममंत्री दादाजी भुसे यांनी विधान परिषदेत सांगितले.

अलिबाग तालुक्यातील रेवस बंदर येथे प्रवासी जेट्टीचे नूतनीकरण करण्याबाबत उपस्थित केलेल्या प्रश्नावर उत्तर देताना मंत्री भुसे बोलत होते. रेवस ते करंजा या दरम्यान रो-रो सेवा सुरू करण्याच्या कामाला सुरुवात करण्यात आली असून केंद्र शासनाच्या सागरमाला योजनेंतर्गत रो-रो जेट्टी बांधण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. या कामासाठीची प्रशासकीय मान्यता २५ कोटींची आहे, मात्र नियुक्त कंत्राटदाराने अपेक्षित गतीने काम न केल्याने त्याचा करारनामा रद्द करण्यात आला आहे. त्याने ५८ टक्के काम पूर्ण केले होते. त्यासाठी १३ कोटी खर्च झाला आहे, मात्र अपेक्षित गतीने काम पूर्ण करीत नसल्याने त्याचा करारनामा रद्द करण्यात आला आहे. त्याच्या कामाची चौकशी करण्यात येणार असून त्याच्यावर नियमानुसार कारवाई करण्यात येईल, तसेच आवश्यकता असल्यास त्याचे नाव काळ्या यादीत टाकले जाईल.

आता रेवस बंदर ते करंजा मार्गाच्या कामासाठी ३७ कोटींच्या सुधारित प्रस्तावास प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. डिसेंबर २०२५ पर्यंत हे काम पूर्ण केले जाईल, तसेच रेवस बंदर येथील गाळ नियमितपणे काढण्यात येत असून यासाठी सागरी महामंडळाच्या मालकीची यंत्रणा वापरली जाते. जलप्रवासी वाहतूक सुरक्षितपणे होण्यासाठी आयआयटी तसेच सेंट्रल वॉटर ॲण्ड पॉवर रिसर्च स्टेशन, पुणे या संस्थांकडून मार्गदर्शन घेण्यात येत असल्याचे मंत्री भुसे यांनी सांगितले.

# भाजपतर्फे खोपोलीत मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना शिबिर

**खोपोली : प्रतिनिधी**



मुख्यमंत्री एकनाथ शिदे यांनी १ जुलैपासून मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना कार्यान्वीत केली असून या योजनेचा लाभ जास्तीत जास्त महिलांना मिळावा, यासाठी खोपोली शहर भाजप व महिला मोर्चाच्या वतीने शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी अनेक महिलांनी सहभागी होत अर्ज दाखल केले.

खोपोली शहराध्यक्ष रमेश रेटरेकर व महिला मोर्चाच्या प्रभारी अध्यक्षा अश्विनी अत्रे यांच्या नेतृत्वाखाली ७ व ८ जुलैदरम्यान दोन दिवसीय शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी ऊतर रायगड जिल्हा महिला मोर्चाच्या अध्यक्षा अश्विनी पाटील, शहराध्यक्ष रमेश रेटरेकर, शहर सरचिटणीस राहूल जाधव, उपाध्यक्ष दिलिप पवार, विकास नाईक, संजय कचरे, हेमंत नांदे, सुनिल नांदे, हिंमत मोरे, किर्ती ओसवाल, शहर महिला मोर्चाच्या सरचिटणीस सुप्रिया नांदे, अपर्णा साठे, विभावरी पाठक, विमल गुप्ते, रसिका शेटे, स्नेहल सावंत, सुनिता पाटणकर, गिता मोहिते, सुनिता महर्षी, सिमा मोगरे, हेमलता कर्णूक, भारती शहा आदीसह प्रमुख कार्यकर्त्यांनी शिबिर यशस्वी केले.

# वाहतूक पोलिसांची धडक कारवाई

**अलिबाग** : सध्या संपूर्ण जिल्ह्यात पर्यटकांनी मोठ्या संख्येने हजेरी लावली असून यामुळे वाहनांची संख्याही वाढली आहे. रविवारी (दि.७) वाहतुकीचे नियम भंग करणाऱ्या २२४ चालकांवर कारवाई करण्यात आली. त्यांच्याकडून दोन लाख दोन हजार २०० रुपये इतका दंड आकारला आहे.

# पेणच्या श्री गणेशमूर्ती रेवदंड्यात विक्रीस दाखल

**रेवदंडा : प्रतिनिधी**



देश-विदेशात पेणमधील श्री गणेशमूर्तींना विशेष मागणी आहे. रेवदंडा पंचक्रोशीतही मागणी असल्याने शहरात श्रीगणेशमूर्ती विक्रीस ठेवण्यात आल्या आहेत.

शहरात श्री स्वामी समर्थ या केसरीनाथ वडके यांचे दुकानात पेणमधील एक ते पाच फूट उंचीच्या आकर्षक मूर्ती विक्रीस आणल्या आहेत. गणेशभक्तांच्या मागणीनुसार माती व प्लास्टर ऑफ पॅरीसच्या मूर्ती उपलब्ध आहेत. गणेशोत्सव नजीक आल्याने ॲडव्हान्स बुकींग सुरू झाली आहे. यावर्षी श्रीगणेशमूर्तींच्या किमतीत २५ टक्के वाढ झाली आहे, असे केसरीनाथ वडके यांनी सांगितले.


## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल श्री. ज्ञानेश्वर दत्तात्रेय पाटील रा. रोहींजण, ता. पनवेल, जि. रायगड खालील प्रमाणे वर्णन केलेली मिळकत जमीन मालक **सय्यद जाकिर अली सय्यद ईस्माईल अली** रा. नागपाडा, ४०००০८ यांजकडून सदर मिळकत विकत घेण्याच्या विचारात आहेत.

मिळकतीचे वर्णन

**मौजे निताळे, ता. पनवेल, जि. रायगड**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार |
|---|---|---|---|
| १०२ | १/अ | ०-४१-००<br>पो.ख. ०-०३-२०<br>एकूण ०-४४-२० | ८.४५ |

तरी सदरहू मिळकतीवर वा कोणत्याही भागावर गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, वचनचिठठी खरेदीखत, तारण, भाडेकरूपणाचा हक्क, पोटगी, साठेकरार, वा तत्सम कोणतेही दावे मालकी वा अन्य हक्क हितसंबंध असलेल्या व्यक्तींनी वा संबधीतांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरूप विषद करून प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्त्यावर लेखी कळवावे. जर वरील मुदतीत कोणाकडूनही काही लेखी हरकत तक्रार दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही किंवा असल्यास सदर हरकती, तक्रारी रद्दबातल आहेत किंवा त्या सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरून आमचे अशील सदर व्यवहार पूर्ण करतील, याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी. व सदर मुदतीनंतर आलेल्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

पनवेल,

दिनांक : ०८/०७/२०२४

**सही/-**
**निलेश द. हातमोडे**
**ॲडव्होकेट**

पत्ता :- शॉप नं. १३०, मुन्सीपल शॉपींग कॉम्प्लेक्स, पहीला मजला, भाजी मार्केटजवळ,पनवेल ता. पनवेल, जि. रायगड. ४१०२०६. मो. नं. ८१०८५५८२८९


# साहित्यिक वारकऱ्यांची अनोखी मैफिल रंगली



**धाटाव : प्रतिनिधी**

कोमसाप रोहा, मुरूड, माणगाव, तळा आयोजित जिल्ह्यातील साहित्यिक कवींची वर्षासहल, नाट्यकर्मी संजय गुंजाळ यांचा षष्ठ्यब्दीपूर्ती सोहळा, महाकवी कालिदास जयंती सोहळा निवी येथील फार्मवर रविवारी (दि.७) रंगला.

मुरूड शाखेचे अध्यक्ष संजय गुंजाळ यांच्या वाढदिवसानिमित्त वृक्षारोपण करून उपस्थित साहित्यिकांनी निसर्ग संवर्धनाची शपथ घेतली. या वेळी कोणसापचे जिल्हाध्यक्ष सुधीर शेठ, समन्वयक अ. वि. जंगम, केंद्रीय प्रतिनिधी गणेश कोळी, दुर्ग अभ्यास सुखद राणे अध्यक्ष संध्या दिवाकर, माणगांव शाखा अध्यक्ष अजित शेडगे, महाड शाखा अध्यक्ष गंगाधर साळवी, तळा शाखाध्यक्ष हेमंत बारटक्के, सचिव विजय दिवकर व मान्यवर उपस्थित होते.

अध्यक्ष संध्या दिवाकर यांनी कार्यक्रमाचे स्वरूप स्पष्ट केले. अ. वि. जंगम यांनी, संजय गुंजाळ यांच्या राजकीय, सामाजिक कार्याचा उल्लेख करत दिलदार माणूस म्हणून जंगम यांनी उल्लेख केला. जिल्हाध्यक्ष सुधीर शेठ यांनी संजय गुंजाळ यांच्या विविध पैलूंचा उलगडा केला.

कवी गंगाधर साळवी यांनी संजय गुंजाळ यांच्या कौतुकावर स्वरचित कविता सादर केली. यावेळी संजय गुंजाळ यांनी वाढदिवशी दिलेल्या प्रेमाची शब्दांतून उत्तराई केली.

# लाडकी बहीण योजनेचे फॉर्म घरपोच मिळवण्यासाठी संपर्क साधण्याचे आवाहन

**माणगाव : प्रतिनिधी**

महाराष्ट्र सरकारने २१ ते ६५ वयोगटातील माता-भगिनींसाठी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना सुरू केली असून या योजनेचे फॉर्म वाटप सुविधा माणगाव नगरपंचायत वार्ड क्र. ४मधील माता-भगिनींना घरपोच केली जाईल, असे आवाहन नगरसेविका ममता थोरे व भाजपचे दक्षिण रायगड युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष निलेश थोरे यांनी केले आहे.

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना असून या योजनेतून माता-भगिनींना दरमहा १५०० रुपये मिळणार असून ही रक्कम त्यांच्या बँक खात्यात दरमहा जमा होणार आहे. ही योजना मंजूर झाल्यापासून महिला वर्गामध्ये आनंदाचे वातावरण असून फॉर्म भरण्याची लगबग सुरू आहे. या योजनेचा लाभ आपल्या वार्डातील जास्तीत जास्त माता-भगिनींना घेता यावा यासाठी माणगाव नगर पंचायतीच्या वार्ड क्र. ४मधील नगरसेविका ममता थोरे व त्यांचे बंधू यांनी भाजपचे दक्षिण रायगड युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष निलेश थोरे यांनी विशेष लक्ष घालून या माता-भगिनींना या योजनेची फॉर्म वाटप सुविधा घरपोच देण्याचे ठरविले असून वार्डातील माता-भगिनींना या योजनेचे फॉर्म हवे असतील त्यांनी (९९२१६३५१५२) या भ्रमणध्वनीवर संपर्क साधण्याचे आवाहन नगरसेविका ममता थोरे यांनी केले आहे.


## जाहीर नोटीस

सर्व लोकांस हया जाहीर नोटीसने कळवण्यात येते की, खाली नमुद केलेली शेत जमीन मिळकत ही खाली लिहीलेल्या जमीन मालक यांचे नावावर ७/१२ उताऱ्या सदरी महसुल दप्तरी नांवे असून ती त्यांचे खुदद, ताबा ,कबजा, मालकी वहीवाटीतील आहे. त्या बिनशेती जमीन मिळकतींचे वर्णन खलीलप्रमाणे

**मौजे नागोठणे ता. रोहा, जि. रायगड येथील मिळकत**

| गट नं. | क्षेत्र आर.चौ.मी. | आकार रू.पै. | प्रकार |
|---|---|---|---|
| २४८/१/अ/२ | ०-८२-३०<br>पोख ०-३८-२०<br>१-२०-५०<br>पैकी ०-१८-०० | ३.९० | खालसा |

वरील मिळकती संबंधात आमचे अशिल यांनी जमीन मालक यांचेशी खरेदी व्यवहार ठरविला आहे. यास्तव वरील मिळकतींवर अन्य कोणाचा गहाण, दान, लिज, फरोक्त, साठेकरार, अखत्यार लिएन, चार्ज, ॲटॅचमेंट अन्न, वस्त्र, निवारा, ताबा, कबजा, वहीवाट वचनचिठ्ठी, दावा, दरखास्त मॉरगेज, संपादन, रिझव्हेशन रेक्वीझेशन, भागीदारी, बक्षीस, कुळ वहिवाट, पोटगी अथवा मिळकतीबाबत वाद, तंटा चालु असल्यास किंवा या व्यवहारास कोणाची काही हरकत असल्यास त्यांनी आपल्या हरकती लेखी कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांचे कडे ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन (७) सात दिवसात लेखी स्वरुपात दाखल करावी. अशा मुदतीमध्ये कोणतीही हरकत न आल्यास उपरोक्त मिळकत ही निर्वेध आहे असे समजुन आवश्यक कागदपत्रे सादर करून खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करणेत येईल याची नोंद घ्यावी व त्यानंतर आलेली कोणतीही हरकत आमचेवर बंधनकारक रहाणार नाही. हे कळावे,

दि ०९/०७/२०२४

**सही/-**
**ॲड. श्री. पी. जी. दाभाडे**

रा. प्लॅट नं. ४०२ बी विंग, चौथा मजला, साई नगरी सोसायटी, छत्रपती शिवाजी नगर, वागळे हॉस्पीटलजवळ, रोहा ता. रोहा जि. रायगड. मो. नं. ९२७२७१३९५६



प्रोसेस जमा
ने.ता. २९/०८/२०२४

## जाहीर नोटीस

**पनवेल येथील मे दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कार्टात**

दिवाणी चौकशी अर्ज क्र. ८५६/२०२४
नि.७/ड

१) श्रीमती मृणाल प्रकाश वडके
२) अमित प्रकाश वडके
३) मंगेश प्रकाश वडके
...............**अर्जदार**

**अर्ज वारस दाखला मिळणे करिता बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट VIII १९२५ नुसार**

अर्जदार मे कोर्टात विनंतीपुर्वक कळवितात की

१) अर्जदार सदरचा चौकशी अर्ज मयत कै. प्रकाश दत्तात्रय वडके, यांचे वारस म्हणुन वारस दाखला मागणी करिता अर्ज करित आहे. मयत कै. प्रकाश दत्तात्रय वडके यांचा मृत्यु दि. ०१/०५/२०२४ रोजी पनवेल, पटवर्धन हॉस्पीटल येथे झाला आहे.

२) अर्जदाराचे याचे मयताशी नातेसंबंध असे अर्जदार क्र. १ वारस पत्नी अर्जदार क्र. २ व ३ वारस मुलगे आहेत. मयतांची आई कै. लक्ष्मीबाई दत्तात्रय वडके यांचे ७ ऑक्टोंबर २०१६ मध्ये तालुका महाड, जिल्हा रायगड, येथे मृत्यु झाला आहे. सबब अर्जदाराचे मृत्युनंतर अर्जदार क्र. १ ते ३ याचे व्यतिरिक्त कुणीही वारस नाही.

३) सदरील मयत कै. प्रकाश दत्तात्रय वडके यांचे मालकी ताबाकबजा वहीवाटीतील मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे -

अर्जदाराचे राहते घर - स्वप्ना सोसायटी, बिल्डींग नं १ रो हॉउस नंबर ४ फायनल प्लोट नं. ७२/२, मालमत्ता क्र. अ ११२२००२८५१/४ असे ज्याचे क्षेत्र ६३५० चौरस फुट आहे. पनवेल येथील टी.पी.सी. फायनल प्लॉट नं. ७२ या प्लॉट अलॉटमेंट दि. ०२/०७/१९८० दाखल केले.

मिळकत रो हाउस पुर्वेस - प्लॉट नं. ५ फायनल प्लॉट नं ७२,
पश्चिमेस - सरोज बिल्डींग,
उत्तर - फायनल प्लॉट नं ७२ सब प्लॉट ३,
दक्षिण - प्लॉट नंबर ७८

२. पनवेल सहयोग नगर सोसायटी बी विंग मधील तळमजलाच्या गाळा नं १४, १५६ चौरस फुट (१४.४९ चौरस मीटर) बिल्टअप मिळकत. तळमजला अधिक ३ मजले अशी इमारती मधील गाळा नं. १४ गाळयाचे वर्णन खालीलप्रमाणे

पुर्वेस - गाळा नं. ११
पश्चिमेस - सोसायटीची ओपन जागा
दक्षिणेस - गाळा नं. १५
उत्तरेस - गाळा नं. १२

अश्या चुतु:सिमा असलेल्या गाळ्याचे क्षेत्रफळ १५ फुट (१४.४९) चौरस मीटर बिल्टअप असे आहे.

तमाम लोकांस कळविणेत येते की अर्जदार क्र. १ ते ३ यानी मयत कै. प्रकाश दत्तात्रय वडके, यांचे वारस म्हणुन वारसदाखला मागणी करिता सदरचा वारस दाखलेचा अर्ज दाखल केला आहे. याबाबत कुणाची हरकत असलेस दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात नोटीस प्रसिध्दी पासुन ३० दिवसाचे आत दाखल करावी.


दिनांक : ५/७/२०२४

कोर्टाचा शिक्का

**सही/-**
**सहाय्यक अधिक्षक**
मे. दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
पनवेल


# फार्मसी महाविद्यालयाच्या परिसरात वृक्षारोपण

**कर्जत : प्रतिनिधी**



कोकण ज्ञानपीठ संस्थेचे संस्थापक प्रभाकर नारायण तथा अप्पासाहेब धारकर यांच्या जयंतीनिमित्त फार्मसी महाविद्यालयाच्या परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. यानिमित्ताने ५० झाडांची रोपे लावण्यात येऊन त्यांच्या संगोपनाची जबाबदारीही घेतली आहे.

फार्मसी महाविद्यालयात अप्पासाहेब धारकर यांच्य प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून त्यांना अभिवादन करण्यात आले. त्यांनतर महाविद्यालयाच्या परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. डॉ. हेमंत तावळे, डॉ. प्रिय बांदिवडेकर यांच्या हस्ते वृक्षारोपणाचा शुभारंभ करण्यात आला. प्राचार्य डॉ. मोहन काळे , डॉ. उज्ज्वला थुबे, डॉ. निलोफर खान, प्रा. स्वप्निल फालक, प्रा. अनिकेत इंदुलकर, प्रा. स्विती दळवी, प्रा. अश्विनी भोईर, प्रा. पूजा मोधळे, प्रा. असफीया खान, प्रा. आशिया दादेल, प्रा. प्रिया खापे, प्रा. ऐश्वर्या नारायणकर, निकेत मंडावळे, विजय जिनगरे आदी उपस्थित होते.

# नवी मुंबईत दुर्लक्षित जागांची सफाई

## रेल्वे स्टेशन, बस डेपोत स्वच्छता मोहीम



**नवी मुंबई : बातमीदार**

दररोज नियमितपणे करण्यात येणाऱ्या स्वच्छतेप्रमाणेच काही दुर्लक्षित जागांची सफाईदेखील विशेष मोहीमेद्वारे करण्यात यावी अशा प्रकारच्या नमुंमपा आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या सूचनांनुसार आठही विभागांमध्ये सखोल स्वच्छता मोहीमा राबविण्यात येत आहेत. यामध्ये नागरिकांना सहभागी करून घेऊन शहरात स्वच्छतेची चळवळ उभी करण्याचा महापालिकेचा प्रयत्न आहे.

या अनुषंगाने अतिरिक्त आयुक्त सुनील पवार आणि घनकचरा व्यवस्थापनाचे उपायुक्त डॉ. अजय गडदे व परिमंडळ २ चे उपायुक्त डॉ. कैलास गायकवाड यांच्या नियंत्रणाखाली घणसोली विभागात विभाग अधिकारी तथा सहा. आयुक्त संजय तायडे यांच्या पुढाकाराने घणसोली रेल्वे स्टेशन व परिसरात विशेष सखोल स्वच्छता मोहीम राबविण्यात आली.

रेल्वे स्टेशन्सच्या स्वच्छतेची जबाबदारी सिडको महामंडळाची असली तरी नवी मुंबईच्या स्वच्छ शहर मानांकनात कोणत्याही प्रकारची कमतरता राहू नये याकरिता आयुक्त महोदयांच्या निर्देशानुसार नवी मुंबई महापालिका सखोल स्वच्छता मोहीमेंतर्गत रेल्वे स्टेशन स्वच्छतेकडे विशेष लक्ष देत आहे.

या अनुषंगाने घेण्यात आलेल्या घणसोली रेल्वे स्टेशन स्वच्छता मोहीमेत पोलीस प्रशिक्षण घेत असलेले दळवी केडमीचे होतकरू युवक-युवती सामाजिक बांधिलकीच्या भावनेने सहभागी झाले होते. तसेच राजीव गांधी महाविद्यालयातील एन.एस.एस.चे विद्यार्थी आणि स्वच्छताप्रेमी नागरिकही उत्स्फुर्तपणे सहभागी झाले होते. हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी विभाग अधिकारी संजय तायडे यांच्या समवेत उप मुख्य स्वच्छता अधिकारी राजेंद्र इंगळे, स्वच्छता अधिकारी विजय पडघन तसेच स्वच्छता निरीक्षक, अधिकारी, कर्मचारी, स्वच्छतामित्र यांनी विशेष योगदान दिले.

सखोल स्वच्छता मोहिमेंतर्गत विभाग अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त भरत धांडे यांच्या नियंत्रणाखाली तुर्भे येथील पेट्रोल पंपांवरील शौचालय सफाईची विशेष मोहीम स्वच्छता अधिकारी संजीव रोकडे यांनी स्वच्छता निरीक्षक व स्वच्छता मित्रांसह राबविली. तसेच कोपरखैरणे विभागाचे सहा. आयुक्त तथा विभाग अधिकारी सुनिल काठोळे यांनी स्वच्छता अधिकारी राजूसिंग चव्हाण यांच्या नियंत्रणाखाली स्वच्छता मित्रांच्या सहयोगाने कौपरखैरणे बस डेपोमध्ये सखोल स्वच्छता मोहीम राबविली.

अशा सखोल स्वच्छता मोहीमांद्वारे दुर्लक्षित जागांप्रमाणेच नागरिकांची मोठ्या प्रमाणावर वर्दळ असते, अशा ठिकाणांचीही स्वच्छता केली जात आहे.

# ट्रेनखाली पडल्याने महिलेने गमावले पाय

## बेलापूर रेल्वेस्थानकातील घटना

**नवी मुंबई : बातमीदार, प्रतिनिधी**

सतत पडणाऱ्या मुसळधार पावसामुळे मुंबईचे जनजीवन विस्कळीत झाले असून लोकलसेवाही ठप्प झाली आहे. त्यामुळे अनेक प्रवासी ट्रेनमधून उतरून पायी चालण्याचा मार्ग स्वीकारताना दिसली. त्यादरम्यान नवी मुंबई येथून एक धक्कादायक घटना घडल्याचे समोर आले. एक महिला फलाटावर वाढलेल्या गर्दीमुळे रेल्वे ट्रॅकवर पडली. या वेळी रेल्वेचा पहिला डबा तिच्या अंगावरून गेला. यामुळे एकच गोंधळ माजला. सुदैवाने ट्रेन तिच्या पायाखाली गेली या दुर्दैवी घटनेत महिलेला तिचे दोन्ही पाय गमवावे लागले, मात्र त्यांचा जीव वाचला.

मुसळधार पावसामुळे हार्बर रेल्वे लाईन विस्कळीत झाली आहे. चुनाभट्टी स्थानकावर प्रचंड पाणी साचल्याने मानखुर्द ते वडाळ्यादरम्यान रेल्वे सेवा बंद ठेवण्यात आली होती. त्यामुळे हार्बर मार्गावर सर्वच स्थानकांवर मोठ्या प्रमाणात गर्दी झाली होती. त्याच वेळी ही महिला सोमवारी सकाळी १०च्या सुमारास बेलापूर स्टेशनवर प्लॅटफॉर्म क्रमांक ३वर ट्रेन पकडण्यासाठी गेली. मात्र बेलापूर ट्रेनमध्ये प्रचंड गर्दी असल्यामुळे तिचा पाय घसरला आणि लोकलखाली पडली. तेवढ्यात ट्रेन सुरू झाली आणि तिच्या अंगावरून गेली आणि तिचे दोन्ही पाय कापले गेले. या दुर्घटनेची माहिती मिळताच रेल्वे आणि पोलीस प्रशासनाने तातडीने धाव घेतली. मोटारमनला सांगून ट्रेन हळूहळू मागे घेण्यात आली. तोपर्यंत ती महिला तशीच विव्हळत झोपून होती.

ट्रेन पूर्णपणे दूर झाल्यावर महिलेने उठून बसत वेदनेने ओरडण्यास सुरुवात केली. या दृष्याने अनेकांच्या डोळ्यांत पाणी आले. काही वेळातच गाडी हटवून त्या महिलेचे प्राण वाचवले, मात्र महिलेचे दोन्ही पाय वाचू शकले नाहीत. त्या महिलेवर सध्या एमजीएम रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या घटनेमुळे मोठी घबराट निर्माण झाली असून प्रवाशांकडून हळहळ व्यक्त होत आहे.

# सिंधुदुर्ग जिल्हा संघातर्फे वृक्षारोपण



**पनवेल : वार्ताहर**

सिंधुदुर्ग जिल्हा रहिवाशी हितवर्धक संघ पनवेल तर्फे शहरातील वडाळे तलावा नजिक नमन बॅटरी ते अमरधाम हायवे सर्व्हिस रोड परिसरात बकुळ, ताम्हण, कांचन, आपटा, गुलमोहर, कदंब, अर्जुन, सोनचाफा, सातवीन, बदाम अशी देशी पर्यावरण पूरक जवळ जवळ १५० झांडाची रोपे लावण्याचा उपक्रम रविवारी (दि. ७) झाला.

या वेळी मंडळाचे कार्यकारिणी सदस्य, कार्यकर्ते, देणगीदार तसेच पर्यावरण प्रेमी, हितचिंतक यांनी प्रतिसाद दिला. रोपांची देखभाल संघ करणार आहे. मंडळाचे अध्यक्ष केशव राणे, उपध्यक्षा प्रिया खोबरेकर, सचिव रामचंद्र मोचेमाडकर, खजिनदार दीपक तावडे, सहखजिनदार बाबाजी नेरूरकर, लेखक पत्रकार दिलीप रेडकर युवा कार्यकर्ते यांनी परिश्रम घेऊन ही रोपे लावली आहेत.

आतापर्यंत या मंडळातर्फे ४५० झाडे लावून निसर्ग संवर्धनाचे कार्य उत्तम रित्यापार पाडले आहे. गेली अनेक वर्षे हा उपक्रम हे मंडळ राबवित आहे. याबद्दल या सिंधुदूर्ग जिल्हा रहिवाशी मंडळाचे पनवेल परिसरात कौतुक होत आहे.

# तुपगावमध्ये महिलांसाठी ‘लाडकी बहीण’ शिबिर

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

चौक तुपगाव येथे मुख्यमंत्री लाडकी बहीण या योजनेचा महिलांना लाभ मिळावा, यासाठी दोन दिवसीय शिबिराचे आयोजन संत गोरोबाकाका मंदिरामध्ये भारतीय जनता पक्ष व हिराबाई कुंभार फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमानाने करण्यात आले होते.

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना, मुलींना स्वावलंबी, आत्मनिर्भर करण्यासाठी व आर्थिक दुर्बल घटकातील महिलांच्या बँक खात्यात प्रति महिना १५०० रुपये जमा होणार असून गावातील सर्व महिलांना या योजनेचा लाभ मिळावा. याकरीता तुपगांवचे लोकप्रिय सरपंच रवींद्र कुंभार यांनी




महिला वर्गासाठी मोफत फॉर्म उपलब्ध करून दिले. योजनेपासून कोणीही वंचित राहू नये. व कागदपत्रासाठी पावसा पाण्यामध्ये धावपळ करायला लागू नये. फॉर्ममध्ये काही त्रुटी राहू नये परिपूर्ण फॉर्म भरला पाहिजे या दृष्टिकोनातून सरपंचाच्या आदेशाने सर्व भाजपचे व मित्र पक्षाच्या युवक कार्यकर्त्यांनी एकत्र येऊन सर्व महिलांचे फॉर्म भरून घेतले त्यांचे कागदपत्राची तपासणी केली.

तुपगांव गावाचे सरपंच रवींद्र कुंभार यांच्या माध्यमातून अनेक वेळा विविध प्रकारचे लोक उपयोगी उपक्रम सातत्याने ते भारतीय जनता पक्ष व हिराबाई कुंभार फाउंडेशनच्या माध्यमातून राबवत असतात याचा ग्रामस्थांनादेखील लाभ होतो. शासनाच्या योजना शेवटच्या घटकापर्यंत योजना शिबिराच्या माध्यमातून पोहचवल्या जातात सरकारी यंत्रणांवरदेखील अशा या शिबिरांमुळे ताण येत नाही. कामाचा ताण कमी होत असतो या दोन दिवसीय शिबिरा मद्ये महिला वर्गाने मोठ्या संख्येने सहभागी होऊन २५० फॉर्म शिबिराच्या माध्यमातून भरून घेण्यात आले आहे.

या योजनेचा कालावधी १ जुलै २०२४ पासून ते ३१ ऑगस्ट २०२४ पर्यंत नोंदणी सुरू राहणार आहे असल्याचे सरपंच कुंभार यांनी सांगितले.

# बेलापूरसाठी महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाकडून चार कोटी निधी उपलब्ध

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

बेलापूर गावातील नागरिक सेक्टर १५, बेलापूर ब्रिजखाली दशविधी क्रिया करण्याकरिता विविध सुखसुविधा नसल्याने धार्मिक कार्यक्रम करण्याकरिता नागरिकांची गैरसोय होत होती. याच अनुषंगाने बेलापूरच्या आमदार मंदा म्हात्रे यांच्या प्रयत्नातून महाराष्ट्र शासनाच्या खाडीकिनारी लगत सुखसोयी योजने अंतर्गत चार कोटी निधी उपलब्ध करून या ठिकाणी विसर्जन घाट, सरंक्षण भिंत, वाहनतळ, पोचरस्ता, पाण्याची टाकी व इतर स्थापत्य कामांचा भूमिपूजन माजी विरोधी पक्षनेता पंढरीनाथ पाटील यांच्या हस्ते झाला.



या वेळी आमदार मंदा म्हात्रे यांच्या समवेत स्थानिक माजी नगरसेवक दिपक पवार, माजी नगरसेवक दि. ना. पाटील, नवी मुंबई व्यापारी अध्यक्ष प्रमोद जोशी, बेलापूर राम मंदिर अध्यक्ष चंद्रकांत पाटील, महादेव पाटील, नारायण मुकादम, शैलजा म्हात्रे, ज्योती पाटील, चंद्राजी, दिवाळे ज्येष्ठ नागरिक विरंगुळा केंद्र अध्यक्ष चंद्रकांत कोळी, गंगेश कोळी, खांदेवाले मच्छीमार रमेश हिंडे, ध्रुवतारा सागरी स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक नरेंद्र कोंडे तसेच असंख्य स्थानिक नागरिक उपस्थित होते.

या वेळी बोलताना आमदार मंदा म्हात्रे यांनी सांगितले की, गेली अनेक ठिकाणी विविध सुखसुविधांचा अभाव असल्याने स्थानिक नागरीकांना धार्मिक कार्याकरिता नाहक त्रास सहन करावा लागत होता. आज त्याच नागरिकांच्या आणि स्थानिक पोलिसांच्या मागणीनुसार आपण खाडी किनारी लगतच्या सुखसोयी योजने अंतर्गत चार कोटी निधीच्या माध्यमातून सर्व सुख सुविधा उपलब्ध करून देणार असल्याचे आमदार मंदा म्हात्रे यांनी सांगितले.



# मॉडर्न स्कूलच्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

पूर्व माध्यमिक व उच्च माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेत मॉडर्न स्कूलने सुयश संपादन केले आहे. शिष्यवृत्ती परीक्षा २०२४ची अंतिम गुणवत्ता यादी नुकतीच प्रसिद्ध झाली असून, यामध्ये मॉडर्न स्कूलच्या काही विद्यार्थ्यांची शिष्यवृत्तीसाठी निवड झाली आहे.

मुलांना शिक्षणाचा खर्च मिळावा या उद्देशाने शिष्यवृत्ती परीक्षेला सुरुवात करण्यात आली, मात्र त्यानंतर या परीक्षेचे महत्त्व हळूहळू वाढू लागले. विद्यार्थ्यांमधील विशेष गुणवत्ता शोधण्याच्या दृष्टीने या परीक्षेकडे पाहिले जाते. या परीक्षेत मॉडर्न स्कूलच्या मराठी माध्यमातील इयत्ता पाचवीतील स्वराज सावंत २४०/३०० गुण मिळवून ठाणे जिल्ह्यात १४ वा, अजिंक्य भोराडे २२२/३०० मिळवून जिल्ह्यात ६५वा आला असून विद्यालयातील इंग्रजी माध्यमातील आठवीमध्ये शिक्षणरी प्रांजल भिलारे १८२/३०० गुण मिळवून जिल्ह्यात १२६ वी आली आहे. यश संपादन केलेल्या सर्वांचे उद्याळ्याच्या प्राचार्या सुमित्रा भोसले यांनी कौतुक केले.

# लाडकी बहीण योजनेची अंमलबजावणी नमुंमपा विभाग कार्यालयांतूनही होणार

**नवी मुंबई : बातमीदार**

राज्य शासनाच्या महिला व बाल विकास विभागाच्या शासन निर्णय २८ जून, २०२४ अन्वये मुख्यमंत्री - माझी लाडकी बहीण ही योजना सुरू करण्यात आलेली आहे. तसेच ३ जुलै २०२४च्या शासन निर्णयान्वये त्यामध्ये अंशत: सुधारणा करण्यात आली आहे.

नवी मुंबई महापालिका क्षेत्रामध्ये वास्तव्यास असलेल्या २१ ते ६५ वर्ष वयोगटातील विवाहीत, विधवा, घटस्फोटित, परित्यक्ता आणि निराधार महिला तसेच त्या कुटूंबातील केवळ एक अविवाहीत महिला यांना या योजनेंतर्गत त्यांच्या आधार लिंक केलेल्या थेट लाभ हस्तांतरण बँक खात्यात दरमहा १५०० रुपये इतकी



रक्कम दिली जाणार आहे. तसेच केंद्र /राज्य शासनाच्या अन्य आर्थिक लाभाच्या योजनेद्वारे १५०० रुपयांपेक्षा कमी लाभ घेत असलेल्या पात्र महिला लाभार्थ्यांना फरकाची रक्कम या योजनेव्दारे देण्यात येणार आहे.

नवी मुंबई महापालिका कार्यक्षेत्रात योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने व जास्तीत जास्त लाभार्थी महिलांना या योजनेचा लाभ मिळण्याच्या दृष्टीने मा. आयुक्त, नवी मुंबई महापालिका यांच्या मार्गदर्शनाखाली दि. ४ जुलै २०२४ च्या आदेशान्वये समाजविकास विभागाचे उपायुक्त किसनराव पलांडे हे मुख्यालय स्तरावर नोडल अधिकारी तसेच समाजविकास विभागाचे सहा.आयुक्त प्रबोधन मवाडे हे सहा.नोडल अधिकारी असतील.

नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रात राहणाऱ्या पात्र महिला लाभार्थ्यांनी नवी मुंबई महापालिकेमार्फत सर्व विभाग कार्यालयात स्थापन करण्यात आलेल्या मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण नोंदणी कक्षयेथे जाऊन सदर योजनेकरीता आपला अर्ज दाखल करुन सदर योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या वतीने करण्यात येत आहे.

# रसायनीतील पिल्लई कॉलेजला ‘नॅक’चे ए प्लस मानांकन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महात्मा एज्युकेशन सोसायटी संचलित रसायनी येथील पिल्लई एचओसी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजीला देशातील शैक्षणिक क्षेत्रात महत्वपूर्ण असलेले नॅक अर्थात नॅशनल असेसमेंट अँड ऍक्रिडिशन कौन्सिलचे ३.३९ सीजीपीएसह ए प्लस हे मानांकन मिळाले असून, हे मानांकन पुढील पाच वर्षांसाठी लागू असणार आहे. या मूल्यांकनातून कॉलेजची शैक्षणिक गुणवत्ता पुन्हा एकदा सिद्ध झाली आहे.

नॅकची ही दुसरी सायकल १४ व १५ जुन रोजी झाली. या वेळी त्रिसदस्सीय समितीने पिल्लई एचओसी इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी कॉलेजचा संपूर्ण आढावा घेतला. यामध्ये नॅकने दिलेले ७ क्रायटेरियाचे अतिशय काटेकोरपणे निरीक्षण व विश्लेषण करण्यात आले. यात शैक्षणिक सोयीसुविधा, अद्ययावत शिक्षण प्रणाली, विभागीय व्हिझिट्स, कॉलेज प्राचार्य, शिक्षक व विद्यार्थ्यांसोबत संवाद, प्रेझेंटेशन, सांस्कृतिक, क्रीडा व अश्या अनेकविध निरीक्षणाअंती कॉलेजला ए प्लस हे मानांकन प्राप्त झाले आहे.

नॅकच्या या सेकेंड सायकलमध्ये मिळालेल्या ए प्लस मानांकनासाठी महात्मा एज्युकेशन सोसायटीचे चेअरमन डॉ. के. एम. वासुदेवन पिल्लई , सेक्रेटरी डॉ. डॅफनी पिल्लई , सीओओ डॉ. प्रियम पिल्लई, डेप्युटी सीईओ फ्रणव पिल्लई, पीआर व कॉर्पोरेट कम्युनिकेशन डिरेक्टर डॉ. निवेदिता श्रेयांस, ॲडमिनिस्ट्रेशन डिरेक्टर डॉ. प्रग्नेश शाह, पिल्लई एचओसीएल एज्युकेशनल कॅम्पसचे डेप्युटी सीईओ डॉ. लता मेनन, इंजिनिअरिंग कॉलेजचे प्राचार्य डॉ. जगदीश बाकल यांचे अतिशय मोलाचे सहकार्य लाभले. या संपूर्ण प्रक्रियेत कॉलेजचे संपूर्ण स्टाफ, शिक्षक, व्यवस्थापनासह विद्यार्थ्यांनी अतिशय मेहनत घेतली. दरम्यान, या मानांकनामुळे पिल्लई एचओसी कॉलेज ऑफ इंजिनिअरिगच्या सर्वांवर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

# नवीन पनवेल ब्राह्मण सभेतर्फे भाऊसाहेब पुंडे स्मृती काव्य स्पर्धा



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

ब्राह्मणसभा नवीन पनवेल, सातत्याने विविध उपक्रम करणारी संस्था असून, यावर्षी त्यांनी आषाढस्य प्रथम दिवसे अर्थात महाकवी कालिदास दिनाच्या अनुषंगाने लक्ष्मण एकनाथ तथा भाऊसाहेब पुंडे स्मृति स्व रचित काव्य स्पर्धांचे आयोजन केले होते.

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या चांगू काना ठाकूर (सीकेटी) महाविद्यालय (स्वायत्त दर्जा) येथील सभागृहामध्ये रविवारी (दि. ७) झालेल्या स्पर्धेतील रंगत उत्तरोत्तर वाढत गेली. २१ कवी कवयित्रींनी आपली पाऊस या विषयाची कविता सादर केली.

मानसी वैशंपायन आणि समीर खरे यांनी या स्पर्धेचे परीक्षण केले. ही स्पर्धा यशस्वी करण्यासाठी ब्राह्मण सभा नवीन पनवेल अध्यक्ष दिपाली जोशी यांच्याबरोबर शामनाथ पुंडे, पद्मनाभ भागवत, शेखर आंबेकर, स्मिता पुंडे, मिलिंद धडफळे, ताम्हणकर यांनी परिश्रम घेतले.

या स्पर्धेत प्रथम वरदा जोशी, द्वितीय अपर्णा साठे, तृतीय पोर्णिमा दीक्षित तर उत्तेजनार्थ पारितोषिक विजेते शंकर आपटे, पद्मजा कुलकर्णी पद्मनाभ भागवत, सुषमा गोखले, मानसी कुलकर्णी, तनवी मीनासे आणि अविनाश देव आहेत.

या वेळी ब्राह्मण सभा नवीन पनवेलचे ६५पेक्षा जास्तअधिक सभासद उपस्थित होते. या सुरेल कार्यक्रमाचे सुरेख सूत्रसंचालन आदित्य पुंडे यांनी केले. शेवटी शामनाथ पुंडे यांनी आभार मानले आणि कार्यक्रम संपला.

# दिघ्यात संवाद नात्यांचा कविता डॉट कॉम कार्यक्रम

**नवी मुंबई : बातमीदार**

दिघा येथे शनिवारी (दि. ६) कवितांचा कार्यक्रम झाला. या कार्यक्रमात हिंदमाता महाविद्यालयाचे प्राचार्य सुरेश डेरेंनी कविता डॉट कॉमच्या संपूर्ण टीमला निमंत्रण देऊन शालेय विद्यार्थ्यांसाठी एक आगळावेगळा उपक्रम घडवून आणला.

या कार्यक्रमात कविता डॉट कॉमचे निर्मिती सूत्रधार प्रा. रवींद्र पाटील तसेच रंगकर्मी कविता डॉट कॉम जीवनगौरव पुरस्कृत मा. रवींद्र औटी, लोककवी जितेंद्र लाड, कवी वैभव वऱ्हाडी, निवेदक नारायण लांडगे, कवियत्री स्वाती शिवशरण, कवी रुद्राक्ष लाड, कवी अनुकूल माळी, तसेच हिंद माता शाळेतील संपूर्ण शिक्षकवर्ग व कर्मचारी उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात शालेय विद्यार्थ्यांनी स्वागत गीताने केली. महाकवी कालिदासांचे जीवनकार्य सांगून, उत्स्फूर्तपणे निवेदन करत नारायण लांडगेंनी कार्यक्रमात प्रबोधन करत रंगत आणली. कवी रुद्राक्ष यांनी कवीसंतोष नारायणकर यांच्या आईवडील या कवितेने सुरुवात करून सगळ्यांना नात्यांचा सवांदातील आई बाबांचे नाते स्पष्ट करून लहाणग्यापासून तर मोठ्यांपर्यंत सगळ्यांच्या डोळ्यांत पाणी आणले. कवी वैभव वऱ्हाडी यांनी जीवनाचे वास्तव कवितेतून मांडले, अन स्वजीवनात आलेले अपयश पचवून कसे पुढे जाता येते हे विद्यार्थ्यांना पटवून दिले.

कवियत्री स्वाती शिवशरण यांनी पाऊसाला साद घालित मंत्रमुग्ध वातावरण तयार केले. लोककवी जितेंद्र लाड सरांनी विद्यार्थ्यांना अनेकानेक दर्जेदार कवितांची मेजवानी भरवत डोळे पणावून सोडले. प्रा. रवींद्र पाटील विद्यार्थ्यांना शिका वाचा आणि जिंका या शब्दांचा अर्थ समजवून येणाऱ्या पिढीला संगणकापासून तर भाषेपर्यंत असलेले ज्ञान किती महत्त्वाचे हे पटवून दिले.

## निवडक



### रोह्यात आरोग्य तपासणी शिबिर

**धाटाव :** खासदार सुनील तटकरे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून राष्ट्रवादी काँग्रेस, रोहा सेंटर आणि भट नर्सिंग होम यांच्या संयुक्त विद्यमाने भव्य आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराचा तब्बल २००हून अधिक नागरिकांनी लाभ घेतला. शिबिराला माजी आमदार अनिकेत तटकरे यांनी भेट दिली. शिबिरासाठी राष्ट्रवादीचे जितू साळुंखे, बाळू पडवळ यांनी मेहनत घेतली. या वेळी सरपंच अमित मोहिते, आतिश पडवळ, रोटरी क्लब रोहा सेंटरचे अध्यक्ष राम नाकती, राकेश कागडा, सृष्टी वाणी तसेच भट नर्सिंग होमचे डॉ. अपूर्व भट, पूजा भट आणि इतर कर्मचारी उपस्थित होते.

### रोहा रेल्वे स्टेशन येथे वृक्षारोपण



**रोहे** : रायगडचे खासदार सुनील तटकरे यांच्या वाढदिवसानिमित्त रोहा राष्ट्रवादीच्या वतीने रेल्वे स्टेशन येथे वृक्षारोपण करण्यात आले. या वेळी रेल्वे पोलीस निरीक्षक प्रदीप भाकर, माजी नगराध्यक्ष संतोष पोटफोडे, मोतीशेठ जैन, माजी उपनगराध्यक्ष महेंद्र गुजर, महेश कोलाटकर, अहमद दर्जी, राष्ट्रवादी शहराध्यक्ष अमित उकडे, नितीन पिंपळे, किराणा व्यापारी असोसिएशन अध्यक्ष विलास गुजर, रेल्वे प्रवासी संघटनेचे अध्यक्ष सूर्यकांत वाघमारे, माजी नगरसेवक मजीद पठाण, रवी चाळके, माज सवाल, निलेश शिर्के, अमित गुजर, राहुल बोबड, मयुर पायगुडे, नितीन कोलाटकर, रेल्वे सुरक्षाबल कर्मचारी दिवसे, म्हात्रे आदी उपस्थित होते. येथे वड, पिंपळ, चिंच, गुलमोहर, जांभुळ, कडुनिंब आदी झाडे लावण्यात आली.

### रेवस ते पाली पदयात्रा उत्साहात



**अलिबाग** : तालुक्यातील रेवस बोडणी मच्छीमार संस्थेतर्फे श्री बल्लाळेश्वर रेवस ते पाली पदयात्रा व पालखी सोहळा उत्साहात झाला. पालखीचा शुभारंभ श्रीराम मंदिर येथून करण्यात आला. मच्छीमार संस्थेचे चेअरमन विश्वास नाखवा, अमर नाखवा, राजेश कोळी, मंडळाचे अध्यक्ष धर्मा कोळी, धनाजी तांडेल, विनायक कोळी, नवनाथ कोळी, अंकल कोळी, हरेश्वर कोळी व रुपेश कोळी यांनी भाविकांचे स्वागत केले. पदयात्रेची पहिली वस्ती शिव येथे व दुसरी वस्ती गरम कुंड उन्हेरे येथे करण्यात आली. त्यानंतर तिसऱ्या दिवशी श्री बल्लाळेश्वर देवस्थान येथे महाआरती करून यात्रेची सांगता श्रीराम मंदिर येथे करण्यात आली.

# खालापूर आयटीआयला हवी हक्काची जागा

## विद्यार्थ्यांचे भवितव्य अंधारात!

**खोपोली : प्रतिनिधी**

कुशल मनुष्यबळ तयार करून कारखान्यांना पुरविणारी खालापूर तालुक्यातील चिंचवली येथील औद्योगिक प्रशिक्षण संस्था सध्या अडचणीत सापडली आहे. सध्या विद्यार्थ्यांना भाड्याच्या इमारतीत प्रशिक्षण दिले जात असून मालकाने ऑक्टोबर २०२४ महिन्यापर्यंतच भाडे करारावर सुरू ठेवणार असल्याचे सांगितल्याने २१२ विद्यार्थ्यांचे भवितव्य टांगणीला लागले आहे.



सुरुवातीपासून समस्यांचे ग्रहण लागलेली औद्योगिक प्रशिक्षण संस्था खालापूरला १५ वर्षांत अद्याप हक्काचे छत मिळालेले नाही. सुरुवातीला खालापूर पंचायत समितीच्या गोडाऊनमध्ये नंतर काही काळ मुळगाव येथील खासगी गोडाऊनमध्ये आणि सध्या खोपोली नगर परिषद हद्दीतील चिंचवली शेकीन येथील भाड्याच्या इमारतीत औद्योगिक प्रशिक्षण संस्था सुरू आहे.

सदर इमारतीची जागा तेजस्वी त्रिंबक देशमुख यांच्या मालकीची असून भाडेकरार करताना सदर जागा शैक्षणिक काम करता वापर होत असल्याने मालमत्ता करात घरपट्टी वाणिज्य प्रमाणे न आकारता शैक्षणिक कारणासाठी असल्याने सूट देण्यात येईल, असे सांगण्यात आले होते, परंतु त्यानंतर खोपोली नगर परिषदेने मालमत्ता कर वाणिज्य स्वरूपात आकारल्याने भाडे करार करताना झालेल्या कराराचा भंग झाल्याची भावना देशमुख यांनी मांडत नगर परिषदेला घरपट्टीत सूट देण्याची विनंती केली, परंतु नगर परिषदेने आमच्या अखात्यारित सदरची बाब येत नसल्याचे सांगून हात वर केल्याने इमारतीच्या मालक देशमुख यांनी औद्योगिक प्रशिक्षण संस्था चिंचवली यांना भाडेकरारची मुदत ऑक्टोबर २०२४मध्ये संपत असून इमारत रिकामी करावी, अशी नोटीस पाठवली आहे.

औद्योगिक प्रशिक्षण संस्थेकरीता आवश्यक अशी जागा शैक्षणिक वर्षाच्या मध्यावर शोधून पुन्हा नव्याने उभारणी करणे अशक्य असल्याने विद्यार्थ्यांच्या प्रशिक्षणात खंड पडू शकतो.

खालापूर नगरपंचायत हद्दीत महड येथे शासनाने औद्योगिक प्रशिक्षण संस्थेकरिता सहा एकर जागा दिलेली आहे. या ठिकाणी कामाला देखील सुरुवात झाली, परंतु काही स्थानिकांनी गैरसमजुतीने कामात खो घातला आहे. इमारतीच्या कामाला गती मिळावी यासाठी शासन स्तरावरून प्रयत्न होणे आवश्यक आहे. स्थानिक लोकप्रतिनिधींनी या विषयावर वैयक्तिक लक्ष घालणे गरजेचे असल्याचे विद्यार्थी व पालकांचे मत आहे.

**शासनाचे भाडे वेळेवर मिळत नसतानादेखील केवळ ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना तांत्रिक प्रशिक्षण मिळण्याची सोय उपलब्ध होत असल्याचा आनंद होता. करार करताना घरपट्टीत ५० टक्के सूट देण्याचेलेखी ठरले होते, परंतु नगर परिषदेने वाणिज्य स्वरूपात भरमसाठ घरपट्टी दंडासह आकारली आहे. यामुळे नाईलाजाने मुदत संपल्यावर करार संपुष्टात आणणार आहे.**

**–तेजस्वी त्रिंबक देशमुख, इमारत मालक**

**औद्योगिक प्रशिक्षण संस्था चिंचवली शेकीन येथे २१२ विद्यार्थी प्रशिक्षण घेत असून ऐन मध्यावर इमारत बदलून सर्व यंत्र, उपकरणे नव्याने स्थापित करणे अवघड होणार आहे. सध्याच्या जागेतच प्रशिक्षण संस्था सुरू रहावी यासाठी वरिष्ठ कार्यालय मुलुंड येथे वरिष्ठांना कळविले असून त्याबाबत लवकर निर्णय होईल, अशी अपेक्षा आहे.**

**–एच.एन. बरगल, प्राचार्य, औद्योगिक प्रशिक्षण संस्था**

## रोह्यातील धाटाव परिसरात वायू प्रदूषण

### पहाटे सर्वत्र रासायनिक धूर

**रोहे : प्रतिनिधी**

तालुक्यातील धाटाव औद्योगिक क्षेत्रातील रासायनिक कारखान्यातून सातत्याने हवेत धूर सोडले जात आहे. या रासायनिक धुरामुळे नागरिकांना सातत्याने त्रास जाणवत आहे. त्याची प्रचिती पुन्हा एकदा आली असून रविवारी पहाटे मोठ्या प्रमाणात हवेत रासायनिक धूर दिसून आले. त्यामुळे सातत्याने धाटाव औद्योगिक क्षेत्रात लगत असलेल्या गावांना वायू प्रदूषणाचा त्रास होत आहे.

धाटाव औद्योगिक क्षेत्रातील रासायनिक कारखान्यामुळे वायु प्रदुषण वाढत असल्याचे रविवारी (दि.७) पुन्हा एकदा दिसून आले. पहाटे मोठया प्रमाणात हवेत पांढऱ्या रंगाचा धूर दिसून आला आहे. सर्वत्र पांढरा धूर दिसून येत होता.




त्यामुळे त्याचा त्रास नागरिकांना जाणवला असून धाटाव भागातील नागरिकांचे डोळे चुरचुरत होते. सकाळी फिरण्यासाठी जाणाऱ्या नागरिकांना या धुराची जाणीव झाल्याची दिसून आले. त्यामुळे सातत्याने धाटाव औद्योगिक क्षेत्रातील कारखान्यांमुळे वायू प्रदूषण होत असून या वायू प्रदूषणावर अंकुश लावण्याची गरज असल्याचे नागरिकांतून बोलले जात आहे. त्यामुळे प्रदूषण मंडळ कोणती भूमिका घेते, याकडे सगळ्यांचे लक्ष लागले आहे.

## माणगावात मुसळधार पाऊस

### काळ नदीची पातळी वाढली; सतर्कतेचा इशारा

**माणगाव : प्रतिनिधी**

तालुक्यात गेल्या ४८ तासांपासून मुसळधार पावसाने थैमान घातले असून जनजीवन विस्कळीत झाले आहे. काळ नदीच्या पाण्याची पातळी वाढली असून नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.



तालुक्यात गेले दोन दिवस मुसळधार पाऊस पडत आहे. त्यामुळे अनेकांनी घरातच राहणे पसंत केले आहे. त्यातच शेतकऱ्यांची लावणीची कामे सुरू आहेत. पावसामुळे दुकानदारांच्या व्यवसायावरही त्याचा परिणाम झाला आहे.

मुसळधार पावसामुळे माणगाव शहरातून वाहणाऱ्या काळनदीच्या पाण्याची पातळी हळूहळू वाढत असून शहरातील काही शाळा, महाविद्यालयाच्या परिसराला पाण्याचा वेढा चोहोबाजूनी पडला आहे. टिकमभाई मेथा महाविद्यालय परिसरात सोमवारी सकाळपासूनच पाण्याचा वेढा पडल्याने महाविद्यालयात त्यादिवशी आलेल्या विद्यार्थ्यांना परतावे लागले.

## अ‍ॅड. राजीव साबळे यांचा वाढदिवस विविध कार्यक्रमांनी साजरा

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष तथा शिवसेनेचे राज्य प्रवक्ते अ‍ॅड. राजीव साबळे यांचा वाढदिवस माणगावात विविध कार्यक्रमांनी उत्साहात साजरा करण्यात आला.

या वेळी द.ग.तटकरे महाविद्यालयात त्यांच्या हितचिंतकांनी भेट घेऊन त्यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. माणगावात १ ते ७ जुलैदरम्यान वृक्षारोपणाचा कार्यक्रम घेण्यात आला, तसेच रविवारी (दि.७) द.ग.तटकरे महाविद्यालयात केईएम रुग्णालय परेल मुंबई रक्तपेढी टीमचे प्रमुख समाज विकास अधिकारी डॉ. प्रकाश सावंत व त्यांचे सहकारी तसेच जिल्हा शासकीय रुग्णालय अलिबाग रक्तपेढीचे प्रमुख डॉ. शीतल स्वामी व त्यांचे सहकारी त्यांच्या संयुक्त विद्यमाने आरोग्य शिबिर झाले. रक्तदान शिबिरात २०४ रक्तबॅगा संकलित करण्यात आल्या.





**माणगाव : शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष तथा शिवसेनेचे महाराष्ट्र राज्याचे प्रवक्ते अ‍ॅड. राजीव साबळे यांना वाढदिवसानिमित्त आमदार भरत गोगावले यांनी शुभेच्छा दिल्या.** (छाया : सलीम शेख)



**मुरूड : पावसामुळे चिकणी गावाजवळील पूल खचल्याने या पुलावरील वाहतूक बंद करण्यात आली आहे.** (छाया : सुधीर नाझरे)

## गाय दूध उत्पादक शेतकऱ्यांसाठी अनुदान योजना जाहीर

**रायगड** : राज्यातील सहकारी दूध संघ व खासगी दूध प्रकल्पांमार्फत संकलित होणाऱ्या गाय दुधासाठी प्रतिलिटर पाच रु. अनुदान गाय दूध उत्पादक शेतकऱ्यांसाठी जाहीर केले आहे, तसेच दूधभुकटी भारताबाहेर निर्यात करणाऱ्या प्रकल्पांना ३० रु. प्रतिकिलो प्रोत्साहनपर अनुदान अनुज्ञेय करण्यांत येत आहे. योजना १ जुलै ते ३० सप्टेंबर या कालावधीपर्यंत लागू राहील. जिल्ह्यातील सहकारी संस्था, खासगी दूध प्रकल्पास या योजनेमध्ये सहभागी होण्यासाठी त्यांचा अर्ज आयुक्त, दुग्धव्यवसाय विकास, महाराष्ट्र राज्य यांना ddemaharashtra@gmail.com या ई-मेल आयडीवर सादर करावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

सहकार/मल्टीस्टेट दूध संघासाठी संघाचे लेटरपॅडवर अर्ज, नोंदणी प्रमाणपत्र, एफएसएसआयचे प्रमाणपत्र, अनुदान योजनेस सहभागी होण्यासाठी संघाचा ठराव, खासगी दूध प्रकल्पांसाठी त्यांचे लेटरपॅडवर अर्ज, औद्योगिक विभागाचे कारखाना नोंदणी प्रमाणपत्र, एफएसएसआयचे प्रमाणपत्र, अनुदान योजनेस सहभागी होण्यासाठी खासगी दूध प्रकल्पाचा ठराव, असणे बंधनकारक आहे.

अनुदान योजना ही राज्यातील शेतकऱ्यांसाठी लागू राहील. सहभागी शेतकऱ्यांकडील जनांवरांची नोंदणी (EaeTag) भारत पशुधन पोर्टलवर असणे बंधनकारक आहे. शेतकऱ्यांचे आधार कार्ड त्यांचे बँक खात्याशी लिंक असावा व ते भारत पशुधन पोर्टलवर नोंद असावे. अधिकच्या माहितीसाठी जिल्हा दुग्धव्यवसाय विकास अधिकारी, रायगड (८३७८९८८७७७) यांच्याशी संपर्क साधावा.

# कोलाडमध्ये बेसिक फ्लड रेस्क्यू प्रशिक्षण

## मध्य प्रदेश येथील एसडीआरएफ टीमचा सहभाग

**अलिबाग : प्रतिनिधी**

आपत्कालीन परिस्थितीत करावयाच्या उपाययोजनांबाबत राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल (एनडीआरएफ)च्या सहभागाने जिल्हा आपत्ती व्यवस्थापन विभाग आणि महाराष्ट्र इंडियन रेस्क्यू अकादमी यांचे संयुक्त विद्यमाने कोलाड येथे मध्य प्रदेश येथील राज्य आपत्ती प्रतिसाद दल (एसडीआरएफ) टीमला ४० दिवसीय बेसिक फ्लड रेस्क्यू कोर्स आणि पीबीएच प्रमाणपत्र निवासी प्रशिक्षण देण्यात आले.




मध्य प्रदेश एसडीआरएफचे महासंचालक हे उपस्थित होते. जिल्हाधिकारी किशन जावळे, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन रायगड प्रमुख सागर पाठक व इंडियन रेस्क्यू अकॅडमी रोहा कोलाड यांच्या संयुक्त विद्यमाने या प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले. प्रशिक्षणामध्ये नागरी संरक्षण दल, आपदा मित्र, पोलीस मित्र, एनसीसी कॅडेट, एनएसएस स्वयंसेवक, रेस्कुअर, गिर्यारोहक आणि सामाजिक संस्थांमध्ये पुढाकाराने समाजकार्य करणारे स्वयंसेवक उपस्थित होते.

प्रशिक्षणात विविध गाठींचे प्रकार, प्रथमोपचार, सीपीआर, स्कुबा, असेंडिग-डिसेडिंग, बोट हॅन्डलिंग, बोट पॉडलींग, रिव्हर क्रॉसिंग, पोहणे, इत्यादी अनेक नवीन रेस्क्यूच्या पद्धतीचे प्रशिक्षण देण्यात आले. महाराष्ट्र इंडियन रेस्क्यू अकादमीमध्ये आपत्कालीन परिस्थितीत रेस्क्यू ट्रेनिंग कोलाड येते दिलं जातं ४० दिवसाचे बेसिक फ्लड रेस्क्यू कोर्स सीपीआर, स्क्युबा,असेंडिग-डिसेडिंग, बोट हॅन्डलिंग, बोट पॉडलिंग, रिव्हर क्रॉसिंग प्रशिक्षण दिली जाते.

## जात वैधता प्रमाणपत्र देण्यासाठी विशेष मोहीम

**रायगड** : अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गातील व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेश घेऊ इच्छित विद्यार्थी, शासकीय/निमशासकीय सेवेतील कर्मचाऱ्यांसाठी त्रुटीपूर्तता शिबिर शुक्रवार (दि.१२) जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती कार्यालय, सेंट मेरीज कॉन्व्हेंट स्कूल मागे, चेंढरे, अलिबाग येथे आयोजित करण्यात आले आहे.

व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेश प्रक्रिया नजीकच्या कालावधीत सुरू होत आहे. याकामी जात वैधता प्रमाणपत्र देणेबाबत विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. अर्जदारांनी शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## अलिबाग खंडाळे येथे वृक्षारोपण

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड फोटोग्राफर आणि व्हिडिओग्राफर असोसिएशनच्या आवाहनानुसार, जिल्हास्तरीय वृक्षारोपण कार्यक्रमाचे एकाच दिवशी करण्याचे आयोजन केले होते. त्यानुसार अलिबाग फोटोग्राफर असोसिएशनतर्फे रविवारी (दि. ७) खंडाळे ग्रामपंचायत हद्दीतील तळवली स्मशानभूमी परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा ग्रंथालय अधिकारी अजित पवार उपस्थित होते.

झाडांच्या संवर्धनासाठी खंडाळे ग्रामपंचायत सरपंच नाशिकेत कावजी यांनी ठिबक सिंचन करून देणार असल्याचे सांगितले. या वेळी माजी उपसरपंच अनंत वैद्य, जिल्हा फोटोग्राफर असोसिएशन उपाध्यक्ष समीर मालोदे, अलिबाग तालुकाध्यक्ष तुषार थळे, सचिव विकास पाटील, खजिनदार विवेक पाटील, कार्याध्यक्ष सुदेश माळी, ज्येष्ठ छायाचित्रकार सुरेश खडपे, विजय पाटील, गणेश जाधव, सोनू असरणी, मार्मिक पाटील, संदेश कवळे, निवृत्ती कोळी, वैभव शिंदे, कुणाल थळे, भूषण पाटील, विराज घरत, योगेश सावंत, अनीकेत म्हात्रे, निलेश दुदम, अमर मढवी, मनोज पाटील, सुरेंद्र वेळे, सुधीर पाटील, दिप नाईक उपस्थित होते. रोपे उपलब्ध करून देण्यात वनाधिकारी प्रसाद गायकवाड यांचे योगदान लाभले.



# भारतीय युवा संघाला विजयी ‘अभिषेक’

## शर्माच्या शतकी खेळीमुळे झिम्बाब्वेवर दणदणीत विजय




**हरारे : वृत्तसंस्था**

भारत आणि झिम्बाब्वे यांच्यातील पाच सामन्यांच्या टी-२० मालिकेतील दुसरा सामना हरारे येथे झाला. या सामन्यात भारतीय संघाने पहिल्या सामन्यातील पराभवाचा बदला घेत अभिषेक शर्माच्या वादळी शतकाच्या जोरावर झिम्बाब्वेचा १०० धावांनी धुव्वा उडवला. भारतीय संघाने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना अभिषेक-ऋतुराजच्या १३७ धावांच्या भागीदारीच्या जोरावर दोन गडी गमावून २३४ धावांचा डोंगर उभारला होता. प्रत्युत्तरात झिम्बाब्वे संघ १८.४ षटकांत १३४ धावांवर गारद झाला. त्यामुळे मालिकेत १-१ ने बरोबरी साधली गेली आहे.

अभिषेक शर्मा आणि ऋतुराज गायकवाड यांनी १३७ धावांची उत्कृष्ट भागीदारी केली. अभिषेकने ४७ चेंडूत १०० धावा केल्या, तर दुसरीकडे ऋतुराज गायकवाडने तेवढ्याच चेंडूत ७७ धावा जोडल्या. या दोघांच्या शानदार खेळीच्या जोरावर भारताने पहिल्या खेळात २३४ धावा केल्या होत्या. यजमान झिम्बाब्वे जेव्हा लक्ष्याचा पाठलाग करण्यासाठी मैदानात उतरला तेव्हा संघाला खराब सुरुवातीच्या धक्क्यातून सावरता आले नाही. वेस्ली मधवेरेने खूप प्रयत्न केले, पण तो ३९ चेंडूत ४३ धावा करून बाद झाला.

२३५ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करण्यासाठी आलेल्या झिम्बाब्वे संघाला पहिल्याच षटकातच मुकेश कुमारने इनोसंट कैयाला अवघ्या चार धावांवर क्लीन बोल्ड केल्याने मोठा धक्का बसला. वेस्ली माधवेरे आणि ब्रायन बेनेट यांनी मिळून ३६ धावांची भर घातली असली तरी मोठा फटका खेळण्याचा प्रयत्न करताना बेनेट मुकेशच्या गोलंदाजीवर बाद झाला. एकेकाळी झिम्बाब्वेची धावसंख्या एका विकेटवर ४० धावा होती, पण पुढच्या सहा धावांतच संघाने तीन महत्त्वाच्या विकेट्स गमावल्या.

दुसऱ्या टी-२० सामन्यात झिम्बाब्वेने एकाच वेळी अनेक विकेट्स गमावल्या. एका विकेटवर ४० धावांवरून संघाची धावसंख्या ४ गडी बाद ४६ अशी झाली. कर्णधार सिकंदर रझालाही केवळ चार धावा करता आल्या. झिम्बाब्वेसोबतच्या एकाच सामन्यात दुसऱ्यांदा असे घडले की संघाने चार गडी गमावून ७२ धावा केल्या होत्या. पण इथून झिम्बाब्वेने चार धावांतच तीन विकेट्स गमावल्या. एकाच वेळी बसलेल्या अनेक धक्क्यातून संघ सावरू शकला नाही.

मुकेश कुमारने टीम इंडियासाठी विकेट्स घेण्यास सुरुवात केली. त्याने सलामीच्या स्पेलमध्ये दोन महत्त्वपूर्ण विकेट्स घेतल्या. रवी बिश्नोई पुन्हा एकदा यशस्वी ठरला त्याने ४ षटकांत केवळ ११ धावांत दोन गडी बाद केले. भारताकडून आवेश खान आणि मुकेश कुमार यांनी सर्वाधिक विकेट्स घेतल्या. या दोघांनी प्रत्येकी तीन विकेट्स घेतल्या. त्याच्याशिवाय वॉशिंग्टन सुंदरलाही एक विकेट घेण्यात यश आले.

# महाराष्ट्र राज्य मानांकन टेबल टेनिस स्पर्धेत अनिशा पात्राला रौप्यपदक




**पनवेल : रामप्रहर वृत्त**

ठाणे जिल्हा टेबल टेनिस असोसिएशनतर्फे डोंबिवली येथील सावळाराम क्रीडा संकुलात महाराष्ट्र राज्य प्रथम मानांकन टेबल टेनिस स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत रायगड जिल्हा टेबल टेनिस असोसिएशनची खेळाडू व खारघरच्या डीएव्ही पब्लिक स्कूलची विद्यार्थीनी अनिशा पात्रा हिने १७ वर्षाखालील मुलींच्या गटात रौप्यपदक पटकावले.

अनिशा पात्रा हिने उपउपांत्य फेरीत ठाणे जिल्ह्याच्या अन्वी थोरातला ३-०ने हरविले, तर उपांत्य फेरीत ठाणे जिल्ह्याच्याच अन्वी गुप्ते हिला ३-१ने मात दिली. अंतिम सामन्यात मात्र अनिशाला ठाण्याची आंतरराष्ट्रीय खेळाडू काव्या भट हिच्याकडून अटतटीच्या लढतींत ३-०ने हार पत्कारावी लागली.

अनिशा पात्रा हिने टेबल टेनिस खेळात चमकदार कामगिरी केल्याबद्दल शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार विजेते व रायगड जिल्हा टेबल टेनिस असोसिएशनचे अध्यक्ष संजय कडू यांनी आनंद व्यक्त केला असून भविष्यात ती ऑलिम्पिक स्पर्धेत नक्कीच खेळेल, अशी आशा व्यक्त केली आहे. याचे सर्व श्रेय सिडकोचे माजी चेअरमन कै. नकुल पाटील यांना जाते. त्यांच्या सहकार्यामुळेच नवीन पनवेल येथील सिडको समाज मंदिर येथील हॉल हा नवी मुंबई स्पोर्ट्स व सामाजिक विकास मंडळास उपलब्ध झाला आहे. त्यामुळेच तेथे टेबल टेनिस खेळाचे प्रशिक्षण व विविध स्पर्धांचे आयोजन करणे सहज शक्य होत आहे.

# राज्य पॉवरलिफ्टिंग अजिंक्यपद स्पर्धेत व्यंकटेश कोणार, काजल भाकरे विजेते

**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य सिनिअर (इक्यूप्ड) पुरुष व महिला पॉवरलिफ्टिंग अजिंक्यपद निवड चाचणी स्पर्धा राज्य पॉवरलिफ्टिंग असोसिएशनच्या वतीने मुंबईतील वडाळा येथे आयोजिण्यात आली होती. स्पर्धेत मुलांमध्ये व्यंकटेश कोणार (उपनगर मुंबई) स्ट्राँग मॅन, तर मुलींमध्ये काजल भाकरे (ठाणे जिल्हा) स्ट्राँग वूमन या किताबाची मानकरी झाली.

स्पर्धेत महाराष्ट्राच्या अनेक जिल्ह्यातून खेळाडू सहभागी झाले होते. स्पर्धेचे वैशिष्ट्य म्हणजे पॉवरलिफ्टिंग खेळात वैयक्तिक कामगिरीद्वारे महाराष्ट्राचे नाव राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्पर्धेत उज्वल केलेले खेळाडू विलास दळवी आणि महिला खेळाडू शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त, महाराष्ट्र शासन कक्ष अधिकारी (सेवानिवृत्त) विजया नर यांना जीवन गौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला. त्याचबरोबर संघटनेचे हितचिंतक आणि ज्येष्ठ क्रीडा पत्रकार सुहास जोशी यांनासुद्धा जीवन गौरव पुरस्कार क्रीडा पत्रकारितेबाबत देण्यात आला. संघटनेने पत्रकारितेमध्ये हा प्रथमच पुरस्कार दिला. सन्मानचिन्ह, शाल, श्रीफळ, पत्नीसाठी सौभाग्य लेणे यासोबत रोख रक्कम देण्यात आली.



या राज्य स्पर्धेतून २० ते २५ ऑगस्ट या कालावधीत कोलकाता (पश्चिम बंगाल) या ठिकाणी होणाऱ्या राष्ट्रीय राष्ट्रीय स्पर्धेसाठी महाराष्ट्र संघाची निवड करण्यात आली आहे.

**गटनिहाय निकाल**

महिला गट : ४७ किलो-काजल भाकरे (ठाणे), हर्षदा घुले (मुंबई उपनगर), मानसी हांडे (मु.उ); ५२ किलो-योगिता गायकवाड (मुं.उ.), मीनाक्षी जाधव (पुणे); ५७ किलो-शुभांगी पाटील (कोल्हापूर), निवेदिता खारकर (मुंबई), अनंता बारुहा (संभाजीनगर); ६३ किलो-सेजल मकवाना (मुं.उ.), आदिती सांगळे (ठाणे), रमय्या तारवडी (ठाणे); ६९ किलो-अक्षया शेडगे (नवी मुंबई), प्रेरणा साळवी (ठाणे), प्रिया कांदळकर (मुं.उ.); ७६ किलो-रुबी दास (मुंबई), सेजल मोईकर (पुणे), तृप्ती सावंत (मुंबई); ८४ किलो-अश्लेषा गुडेकर (मुं.उ.), प्रतिभा लोणे (ठाणे), शिवानी गुरव (पुणे); ८४+ किलो-मृणाली भोग (पुणे), वैशाली तांडेल (मुंबई), सुप्रिया मालवडकर (पुणे); पुरुष गट : ५३ किलो-धर्मेंद्र यादव (मुंबई), नीरज यादव (मुं.उ.), प्रशांत दुमडे (ठाणे); ६६ किलो-वेंकटेश कोणार (मुं उ.), साहिल उतेकर (मुंबई), अमोल करगुटकर (मुं. उ.); ७४ किलो-प्रांजल पाटेकर (ठाणे), वैभव थोरात (छत्रपती संभाजीनगर), दीपक शाहू (पालघर); ८३ किलो-अक्षय दीडवाघ (सातारा), जितेंद्र यादव (मुंबई), मोहित गमरे (छत्रपती संभाजीनगर); ९३ किलो-विवेक सांबरे (ठाणे), रवींद्र साळवे (छत्रपती संभाजीनगर), कुणाल राठोड (छत्रपती संभाजीनगर); १०५ किलो-ऋतुराज पाटील (कोल्हापूर), अश्विन सोलंकी (मुंबई), संकेत चव्हाण (मुं. उ.); १२० किलो-जितेन राणे (मुं.उ.), अजिंक्य पडवणकर (मुंबई), राजेश शेटे (मुंबई); १२०+किलो- चैतन्य शास्त्री (पुणे), रितीक पोळ (रायगड).

# नेदरलँड्स युरो चषक स्पर्धेच्या उपांत्य फेरीत; तुर्की पराभूत

**बर्लिन : वृत्तसंस्था**

कोडी गाकपोची भन्नाट वेगवान आक्रमकता आणि त्याला रोखण्याच्या नादात मेर्ट मुलदूरकडून अनवधानाने झालेल्या स्वयंगोल, त्यापूर्वी स्टिफन डी व्रायने केलेला बरोबरीचा गोल यामुळे नेदरलँड्सने युरो अजिंक्यपद फुटबॉल स्पर्धेच्या उपांत्यपूर्व फेरीत तुर्कीचा २-१ असा पराभव केला. त्यामुळे नेदरलँड्सला तब्बल २० वर्षांनी युरो स्पर्धेची उपांत्य फेरी गाठता आली.

सामन्याच्या ३५व्या मिनिटाला सामेत अकायदिनच्या अचूक हेडरमुळे तुर्कीने आघाडी घेतली. उत्तरार्धात सामन्याच्या ७०व्या मिनिटाला डी व्रायने नेदरलँड्सला बरोबरी साधून दिली. सहाच मिनिटांनी मेर्ट मुलदूरकडून स्वयंगोल झाल्याने नेदरलँड्सला २-१ अशी आघाडी मिळाली आणि याच आघाडीवर त्यांचा विजय साकार झाला. नेदरलँड्सला २००४नंतर प्रथमच युरो स्पर्धेच्या उपांत्य फेरीत स्थान मिळवता आले. त्या वेळी पोर्तुगाल येथे झालेल्या स्पर्धेत नेदरलँड्सने स्वीडनचा शूटआऊटमध्ये ५-४ असा पराभव केला होता.

दरम्यान, ड्युसेलडॉर्फ येथे झालेल्या सामन्यात इंग्लंडने तुर्कीवर शूटआऊटमध्ये मात केली. तीन वर्षांपूर्वी युरो अजिंक्यपद फुटबॉल स्पर्धेच्या अंतिम फेरीत शूटआऊटमध्येच इंग्लंडला पराभव पत्करावा लागला होता. यंदा याच स्पर्धेत नियोजित वेळेतील १-१ अशा बरोबरीनंतर शूटआऊटमध्ये स्वित्झर्लंडचा ५-३ असा पराभव करीत इंग्लंडने उपांत्य फेरीत धडक मारली.

# लिजेंड्स ख्रिस गेलचा झंझावात

## वर्ल्ड चॅम्पियनशिपमध्ये विंडीजची आफ्रिकेवर मात

**बर्मिंगहॅम : वृत्तसंस्था**

वर्ल्ड चॅम्पियनशिप ऑफ लिजेंड्सच्या स्पर्धेत ख्रिस गेलचे झंझावाती वादळ पुन्हा पाहायला मिळाले. आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती घेतलेला गेल वर्ल्ड चॅम्पियनशिप ऑफ लिजेंड्मध्ये वेस्ट इंडिज चॅम्पियन्सकडून खेळत आहे. दक्षिण आफ्रिकन चॅम्पियन्सविरुद्धच्या रविवारी (दि. ७)झालेल्या सामन्यात गेले वादळी खेळी साकारत क्रिकेटविश्वाचे लक्ष वेधून घेतले. बर्मिंगहॅमच्या मैदानावर त्याने अवघ्या ४० चेंडूंमध्ये ७० धावांची दमदार खेळी केली, ज्यामुळे विंडीजने दक्षिण आफ्रिकेवर सहज मात केली.





या सामन्यात प्रथम फलंदाजी करताना दक्षिण आफ्रिकेच्या चॅम्पियन्सने २० षटकांत पाच गडी गमावून १७४ धावा केल्या. आश्वेल प्रिन्स आणि डॅन विलास यांनी केलेल्या ४६ आणि ४४ धावांच्या नाबाद खेळीमुळे दक्षिण आफ्रिकेने या धावा केल्या. या दोघांशिवाय रिचर्ड लुईसने २० धावांची, तर जेपी ड्युमिनीने २३ धावांची खेळी खेळली. वेस्ट इंडिजकडून जेसन मोहम्मदने सर्वाधिक दोन बळी घेतले.

वेस्ट इंडिज चॅम्पियन्ससमोर १७५ धावांचे मोठे लक्ष्य होते. या लक्ष्याचा पाठलाग करण्यासाठी ख्रिस गेल आणि ड्वेन स्मिथ या सलामी जोडीने पहिल्या विकेटसाठी ८.३ षटकांत ६५ धावा जोडल्या. स्मिथ २२ धावा करून बाद झाला, पण गेलचे वादळ घोंगावतच राहिले. त्याने दक्षिण आफ्रिकन चॅम्पियन्सच्या गोलंदाजांचा समाचार घेताना, ज्यामुळे वेस्ट इंडिज चॅम्पियन्सने १७५ धावांचे लक्ष्य पाच चेंडू शिल्लक असताना पूर्ण करून सामना जिंकला.

या सामन्यात ख्रिस गेलने ४० चेंडूंचा सामना करत ७० धावा केल्या. त्याने १७५च्या स्ट्राईक रेटने खेळताना सहा षटकार आणिचार४ चौकार ठोकले. गेल जेव्हा आऊट झाला तोपर्यंत काम पूर्ण झाले होते. वेस्ट इंडिजला जास्त धावा करायच्या नव्हत्या. संघाच्या हातात आठ विकेट्स व्यतिरिक्त सात षटके बाकी होती. त्यामुळे वेस्ट इंडिज चॅम्पियन्सने हा सामना सहा गडी राखून जिंकला. वेस्ट इंडिजने १७५ धावांचे लक्ष्य १९.१ षटकांत चार गडी गमावून पूर्ण केले. गेलला त्याच्या स्फोटक खेळीसाठी सामनावीर म्हणून गौरवण्यात आले.

### कोपा अमेरिका फुटबॉल स्पर्धा

# उरुग्वेकडून पराभवामुळे ब्राझीलचे आव्हान संपुष्टात

**लास वेगास : वृत्तसंस्था**

तारांकित आक्रमकपटू व्हिनिशियस ज्युनियरच्या अनुपस्थितीचा ब्राझीलला मोठा फटका बसला आणि रविवारी उपांत्यपूर्व फेरीच्या लढतीत उरुग्वेकडून पराभव पत्करावा लागल्याने ब्राझीलचे कोपा अमेरिका फुटबॉल स्पर्धेतील आव्हान संपुष्टात आले. नियमित वेळेतील गोलशून्य बरोबरीनंतर शूटआऊटमध्ये उरुग्वेने ४-२ अशी सरशी साधली. त्यामुळे १०व्यांदा कोपा अमेरिका जिंकण्याचे ब्राझीलचे स्वप्न आता पूर्ण होऊ शकणार नाही.

यंदाच्या स्पर्धेत दोन वेळा पिवळे कार्ड मिळाल्याने व्हिनिशियसला उपांत्यपूर्व फेरीच्या लढतीत खेळता आले नाही. त्याच्या अनुपस्थितीत १७ वर्षीय प्रतिभावान आक्रमकपटू एन्ड्रिकला सुरुवातीपासून खेळण्याची संधी मिळाली, मात्र अतिशय आक्रमकपणे खेळणाऱ्या उरुग्वेसमोर त्याला फारसा प्रभाव पाडता आला नाही.

निर्धारित वेळेतील निराशाजनक खेळानंतर अखेर सामन्याचा निकाल लावण्यासाठी पेनल्टी शूटआऊटचा अवलंब करण्यात आला. यात उरुग्वेने ४-२ अशी बाजी मारताना उपांत्य फेरी गाठली. उरुग्वेला १९९२पासून प्रथमच ब्राझीलविरुद्ध सलग दोन सामने जिंकण्यात यश आले आहे. गेल्या वर्षी विश्वचषक पात्रता फेरीतील सामन्यातही उरुग्वेने बाजी मारली होती.




**श्री. स.स. बाळकृष्ण महाराज अध्यात्मिक ज्ञानमंदीर, शिवाजीनगर**

वर्ष २१ वे | ॥ ॐ बाळकृष्णाय नमः॥ | स्थापना २००३



श्री समर्थ सद्गुरू बाळकृष्ण महाराज (नंदेश्वर) | श्री समर्थ सद्गुरू भाऊसाहेब महाराज (नंदेश्वर) | स्वानंद सुखनिवासी संयोजक स्मृती (शि. नगर) पिताजी **श्री. चांगू काना ठाकूर** | स्वानंद सुखनिवासी संयोजक स्मृती (शि. नगर) माताजी **श्रीमती भागूबाई चांगू ठाकूर** | श्री समर्थ सद्गुरू दादामहाराज (मुंबई)

**पुण्यतिथी सोहळा**

आपणांस कळविण्यात येते की, आमचे वडिल स्वानंद सुख निवासी **’श्री.चांगू काना ठाकूर’** यांची पुण्यतिथी मिती आषाढ शु. ०३, शके १९४६, **मंगळवार, दि. ०९/०७/२०२४ रोजी सकाळी १०.०० वा.** श्री समर्थ दासबोध वाचण ग्रंथ श्री बाळकृष्ण महाराज यांचे चरित्रामृत ग्रंथाचे पारायण प्रारंभ, आषाढ शु. ०४, शके १९४६ **बुधवार, दिनांक १०/०७/२०२४** रोजी दुपारी १२.०० वा. पुण्यतिथी निमित्ताने माऊलीवर पुष्पवृष्टी शिवाजीनगर येथे साजरी होणार आहे. तरी आपण सर्व नातेवाईक, गुरूबंधु भगिनीनी उपस्थित रहावे, ही विनंती.

**कार्यक्रम**

**मंगळवार, दिनांक ०९/०७/२०२४**

| | |
|---|---|
| **सकाळी ०९.०० ते १०.०० - भजन** | बाळकृष्ण महाराज संगीत भजन, न्हावाखाडी (उत्तरपाडा)<br>बुवा : गणपत ठाकूर, नितीन ठाकूर, श्री. रमण ठाकूर<br>पखवाज : आत्माराम मोकल |
| **सकाळी १०.०० ते १२.०० - प्रवचन** | श्री. स. स. बाळासाहेब महाराज, नंदेश्वर, श्री.भागवत साहेब, पुणे<br>ह. भ. प. आप्पा पांचाळ महाराज, चिपळूण,<br>ह. भ. प. रामनाथ महाराज, वहाळ, श्री. रमण ठाकूर (न्हावाखाडी),<br>श्री. अरुणशेठ ठाकूर |
| **दुपारी ०२.०० ते ०३.०० - भजन** | श्री विश्वंभर भजन मंडळ, गव्हाण. गायक : हेमंत कोळी,<br>रविराज कोळी आणि मंडळी |
| **दुपारी ०३.०० ते ०५.०० - भजन** | भावभक्ती महीला मंडळ, गव्हाण - कोपर<br>गायीका : श्रीमती हिराबाई घरत, सौ. आनंदी घरत, सौ. रत्नप्रभा घरत,<br>सौ. चंद्रभागा घरत. श्री गुरुकृपा महिला भजन मंडळ - कोपर<br>गायीका : सौ. सुप्रिया घरत, वादक : तुषार घरत |
| **सायं. ०५.०० ते ०६.०० - भजन** | संत जनाबाई भजन मंडळ, विहीघर. गायीका : पुनम ठाकूर, रूपम वास्कर<br>श्री. हर्षल फडके (विहीघर), पखवाज : श्री. मधुकर डोंगरे |
| **सायं. ६.०० ते ७.०० - आरती** | : माऊलींची आरती |
| **सायं. ०७.०० ते ०८.००** | एकनाथी भागवत ध्यान |
| **सायं. ०८.०० ते ०९.०० - भजन** | दत्त प्रासादिक भजन मंडळ, कोपर<br>बुवा : श्री. वसंतशेठ पाटील, कोपर<br>पखवाज : गौरव म्हात्रे, गव्हाण |
| **सायं. ०९.०० ते ११.०० - किर्तन** | ह.भ.प. पुरुषोत्तम महाराज धाटाव आणि मंडळी |
| **रात्री ११ नंतर** | रात्रीचे बारा अभंग,<br>जागर (भजन- सार्वजनिक गुरूबंधू भगिनी) |

**बुधवार, दिनांक १०/०७/२०२४**

| | |
|---|---|
| **सकाळी ०८.०० ते १०.०० - भजन** | नादब्रम्हा भजन मंडळ (खारघर-रांजणपाडा)<br>बुवा : श्री. निवृती बुवा चौधरी,<br>वसंतशेठ पाटील-कोपर, ज्ञानेश्वर म्हात्रे-गव्हाण, गणपत ठाकूर-कोपर, भाऊ ठाकूर, सुरेश ठाकूर - शि. नगर, नितीन ठाकूर-त. पाडा, श्री. महेश पाटील, न्हावा, पखवाज : गौरव म्हात्रे |
| **सकाळी १०.०० ते १२.०० - प्रवचन** | श्री. स. स. बाळासाहेब महाराज, नंदेश्वर, |
| **दुपारी १२.०० वाजता** | श्री. माऊलीवर पुष्पवृष्टी |

**कार्यक्रमाचे ठिकाण**

**श्री. स. स. बाळकृष्ण महाराज अध्यात्मिक ज्ञानमंदीर, शिवाजीनगर**
मु. शिवाजीनगर, पो. गव्हाण, ता. पनवेल, जि. रायगड. फोन नं. ९१६७९९१०४५

**व्यवस्थापक**

**देवसागर साधक समाज (इंचगिरी सांप्रदाय)**
शिवाजीनगर - गव्हाण - न्हावेखाडी - कोपर (संचलित)

**संयोजक**

**श्री. रामशेठ ठाकूर (माजी खासदार) आणि परिवार, ग्रामस्थ मंडळ, शिवाजीनगर**

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com